# साहित्य

ऑगस्ट–सप्टेंबर–ऑक्टोबर २०२२



कविवर्य शंकर रामाणी
(जून २०२१–२२ जन्मशताब्दी वर्षानिमित्त)

# साहित्य

मुंबई मराठी साहित्य संघाचे त्रैमासिक

स्थापना : जानेवारी १९४७

## ऑगस्ट–सप्टेंबर–ऑक्टोबर २०२२

संपादक

**नारायण लाळे**

सहसंपादक

रेखा नार्वेकर

प्रकाशक

उज्ज्वला मेहेंदळे

मुखपृष्ठ / आतील चित्र / मुद्रितशोधन : सौजन्य – ग्रंथाली

अक्षरजुळणी : ग्रंथाली छपाई : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई–४०००३१

■ मूल्य तीस रुपये. वार्षिक वर्गणी (दिवाळी अंकासह) रु. २००/–
द्वैवार्षिक वर्गणी रु. ४००/–

■ धनादेश 'मुंबई मराठी साहित्य संघ' या नावे असावा.

■ NEFT S/B A/C No. 002200100046717
IFSC : SRCB0000002
Bank Name - The Saraswat Co-op. Bank, Girgaum



**व्यवस्थापकीय पत्ता :** मुंबई मराठी साहित्य संघ, साहित्य संघ मंदिर, डॉ. भालेराव मार्ग,
गिरगाव, मुंबई ४००००४. दूरध्वनी : २३८७६१५८, २३८५६३०३
इमेल : sahityasangha@gmail.com & sahityasangh@mtnl.net.in
वेबसाइट : www.mumbaimarathisahityasangh.com

**संपादकीय पत्ता :** १०४, सीतामाई, अयोध्या नगरी, मानपाडा रोड,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१ ● (मो. ९९८७९२४१९९)



या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे. या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ व राज्यशासन सहमत असेलच असे नाही.

# साहित्य : ऑगस्ट-सप्टेंबर-ऑक्टोबर २०२२

## अनुक्रम


- संपादकीय / २
- लेख - अलक्ष लागले दिवे / ३
  डॉ. अनुजा जोशी
- लेख - ना.धों. महानोरांची कविता / ११
  डॉ. मधुकर वर्तक
- लेख - पाटीलसर आठवताना... / ३०
  अशोक बेंडखळे
- ललितलेख - कुंजण / ३४
  पौर्णिमा केरकर
- लेख - अनोखी परंपरा / ३७
  प्रा. डॉ. नरेंद्र पाठक
- **कविता –** दा.गो. काळे, राधा भावे, सुलभा कोरे, स्मिता पाटील, वसंत वाहोकार, अमिता कोकाटे, गिरिजा मुरगोडी / ४० ते ४४
- **पुस्तक परिचय –** आस, अमृतस्पर्श, बायका झुळझुळत ठेवतात आयुष्याचा पदर, ऐन विणीच्या हंगामात / ४५
  राजीव जोशी
- संकलन - २१ जुलै / ५६
  संजीव वेलणकर
- प्रतिक्रिया - विजय जोशी, नरेंद्र पाठक, अनुपमा उजगरे / ५७
- अभिनंदन, पुरस्कार, नवे काही / ३९, ५८
- साभार पोच / ५९
- श्रद्धांजली / ३६

# संपादकीय

२१ जुलै. मुंबई मराठी साहित्य संघाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा दिवस. केवळ साहित्य संघाच्याच नाही, तर मराठी साहित्य आणि नाट्यच्या दृष्टीनेही हा दिवस आनंदाचा, अभिमानाचा आणि अभिनंदनाचा आहे, असे म्हणावे लागेल. ज्याने हे 'झाड' लावलं, वाढवलं ज्यांनी या 'झाडा'ची निगा राखली, त्यासाठी अथक कष्ट घेतले आणि आजही घेताहेत त्या सर्वांच्या अभिमानाचा हा दिवस. २१ जुलै १९३५ रोजी, मुंबई मराठी साहित्य संघाची स्थापना करण्यात आली, तो हा दिवस. डॉ. अ.ना. भालेराव हे या संस्थेचे संस्थापक. त्यांना विनम्र अभिवादन करून ज्या संस्थेने अल्पकाळात सार्वत्रिक आपुलकी निर्माण केली, प्रतिष्ठा वाढवली, संस्था कार्यकृतीचा ठसा उमटवला त्या आपल्या, मुंबई मराठी साहित्य संघाचा २१ जुलै हा महत्त्वाचा आणि अत्यानंदाचा दिवस.

'साहित्यकृतीच्या आकलनासाठी वाचकाला भाषिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक संकेतांचे ज्ञान असावे लागते. त्या ज्ञानाशिवाय त्याला साहित्यकृतीचे आकलन होऊ शकत नाही. सुजाण वाचक भाषिक ज्ञानक्षमता, साहित्यिक ज्ञानक्षमता आणि सांस्कृतिक ज्ञानक्षमता अशा तीन प्रकारच्या ज्ञानक्षमतांनी युक्त असतो.' – ज्येष्ठ समीक्षक आदरणीय गंगाधर पाटील. ९ जुलै २०२२ रोजी त्यांचे देहावसान झाले. माणूस जातो त्यावेळी तो बरोबर काहीच घेऊन जात नाही, परंतु अशी माणसं समाजासाठी बरंच काही ठेवून जातात! मराठी साहित्यक्षेत्राला आणि खासकरून मराठी समीक्षेला आदरणीय गंगाधर पाटील यांनी दिलेले योगदान कधीही न संपणारे आहे. अपूर्व आहे. त्यांना भावपूर्ण आदरांजली.

मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्यवाह डॉ. अश्विनी भालेराव–गांधी यांना जागितक परिषदेत 'International Society for the study of Vulvovaginal Disease' संबंधित फेलोशिप मिळाली, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन! संपादकीयमध्ये याचा उल्लेख करण्याचे कारण, डॉ. अश्विनी भालेराव–गांधी या पहिल्या भारतीय आहेत ज्यांना ही फेलोशिप मिळाली आहे.

काही योगायोग आनंदायी, अनोखे, अभिमानास्पद असतात. महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या अध्यक्षपदी श्री. राहुल नार्वेकर यांची निवड झाली. श्री. नार्वेकर हे आपल्या कार्यसमिती सदस्या रेखा नार्वेकर यांचे पुतणे, महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सभापती कै. जयंतराव टिळक हे डॉ. उज्ज्वला मेहेंदळे यांचे मामा आणि कै. वि.स. पागे हे श्री. प्रकाश पागे यांचे वडील हेदेखील महाराष्ट्र विधानपरिषदेचे अध्यक्ष होते. मुंबई मराठी साहित्य संघाची ही अनोखी आणि अभिमानास्पद परंपराच म्हणावी लागेल.

प्रस्तुत अंकात वरील सर्व विषयांवर सविस्तर मजकूर देण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय 'कुंजण' या सुगंधी रानफुलांची ओळख गोव्याच्या लेखिका पौर्णिमा केरकर यांनी करून दिली आहे. हा अंक वाचकांना आवडेल, या आशेवरच पुढील अंकाची (नोव्हें. डिसें. जाने. २०२२चा दिवाळी अंक) मदार ठेवली आहे.

**– नारायण लाळे**

# अलक्ष लागले दिवे

## डॉ. अनुजा जोशी

दिवे लागले रे दिवे लागले रे
तमाच्या तळाशी दिवे लागले

ही सुप्रसिद्ध कविता लिहिणारे गोमंतकीय कविवर्य शंकर रामाणी यांचे जून २०२१-२२ हे जन्मशताब्दी वर्ष. हे औचित्य साधून त्यांच्या आत्ममग्न कवितेला त्यांच्या 'तमाच्या तळाशी' असलेला हाच 'उजाळा' आपण नव्याने देत आहोत. रामाणींचा हा 'तम' म्हणजे केवळ अंधार नव्हे, तर गूढाच्या तळाशी रामाणींनी आत्मसाक्षात्काराचे दिवे उजळले त्याचा तो 'उजाळा' आहे, 'उजवाड' आहे !

गोव्यामध्ये मराठी कवितेचा वारसा बा.भ. बोरकरांनंतर शंकर रामाणींनी समर्थपणे पुढे चालवला. बोरकरांची कविता निखळ आनंदमार्गी व रामाणींची कविता गूढ व्यथामार्गी असा मुळातील फरक असला तरी दोन्हींची अंतःप्रेरणा व आशयसूत्रे सकारात्मक जीवननिष्ठेचीच आहेत, असे दिसून येते. 'कोण मी कोठला एकट्या वाटेचा ओठावर ऋचा शब्दब्रह्म' असे म्हणणाऱ्या रामाणींनी एकनिष्ठपणे कवितेची साधना केली. 'दिवे लागले रे दिवे लागले' यासारखी विशुद्ध आत्मानुभूती हे त्या साधनेचे फलित होते. मात्र मराठी कवितेमधील अनेक स्थित्यंतरांच्या मध्यंतरीच्या काळात दुःखाच्या निबिड तळाशी 'आषाढतंद्री' लावून बसलेल्या व एकलेपणाची 'वैशाखव्यथा' पांघरलेल्या रामाणींच्या कवितेचा समग्रतेने विचार झाला नाही. तथापि, आजच्या नव्या काळातही जाणिवापोषक मूलद्रव्य असणारे तिचे प्रातिनिधिक मूल्य अबाधित असल्यामुळे या कवितेची नव्याने चर्चा होणे गरजेचे आहे, हा समग्र काव्यप्रवास असा आहे-

सूर्यफुले (१९४९), कातरवेळ (१९५९), आभाळवाटा (१९६७), पालाण (१९७९), दर्पणीचे दीप (१९९२) आणि गर्भागार (२०००) हे रामाणींचे सहा मराठी कवितासंग्रह व 'ऊर्मिला' (१९७४) या संगीतिकेची पुस्तिका प्रकाशित झाली आहे.

मराठीप्रमाणेच त्यांनी कोकणीतही दर्जेदार कविता लिहिली. जोगलांचे झाड (१९८७), निळे निळे ब्रह्म (१९९३), ब्रह्मकमळ(१९९५) व निरंजन (१९९८) हे त्यांचे चार कोकणी कवितासंग्रह आहेत.

सुमारे सात-आठशे वर्षांपासून चालत आलेल्या मराठीच्या काव्यपरंपरेला आरंभीच्या काळात मुख्यत्वे संत-पंत व शाहिरी काव्यांमधून गती मिळाली. या आदिस्रोतांकडून पोषण झालेले नवसंवेदन मराठी काव्याच्या पुढील प्रत्येक कालखंडात अभिव्यक्त होत राहिले. स्वातंत्र्यपूर्वकाळात तर याचे बहुमोल राहिलेच, पण १९४५ च्या दरम्यानचे 'नवकविते'चे परिवर्तनपर्व असो किंवा १९६०च्या दरम्यानचे आधुनिकतेचे पर्व असो, प्रत्येक कालखंडात ही बीजरूप आदिप्रेरणा नवनवीन रूपांमध्ये प्रकट झाली. गोवा, कर्नाटक, हैदराबाद, तेलंगण, छत्तीसगढ, मध्य प्रदेश व गुजरात या 'बृहन्महाराष्ट्र' म्हटल्या जाणाऱ्या मराठी प्रांतांतही संत-पंत व तंत साहित्याच्या संस्कारांतून घडलेली मराठी काव्यप्रतिभा तेवढीच सशक्त असल्याचे दिसून आले. उभा-आडवा कसाही छेद घेतला तरी हे स्तर स्पष्टपणे दिसतात. केशवसुत-मर्ढेकर-विंदा-सुर्वे-चित्रे विविध टप्प्यांवर वेगवेगळ्या रूपात प्रकटलेली काव्यचेतना समग्र मराठी प्रांतात एक-स्वरूप अशीच होती. बृहन्महाराष्ट्रीय प्रदेशातील तांबे-चंद्रशेखर-दत्तकवी इंदिरा संत ही नावे जशी समग्र मराठीचे मानदंड ठरली, तसे या मांदियाळीत गोमंतभूमीने मराठीला दिलेले 'अक्षर' योगदान म्हणजे बा.भ. बोरकर व शंकर रामाणी हे होय.

गोव्यामध्ये ४५० वर्षांच्या पोर्तुगीज राजवटीच्या पार्श्वभूमीवर विविध जातीवर्णांच्या अनेक पिढ्या मराठी संस्कृतीची पाळेमुळे खोलवर रुजवून टिकून राहिल्या हे खूप महत्त्वाचे ठरते. असंख्य भक्तिपरायण पूर्वज कुटुंबांनी दास्यत्वातील हलाखीला तोंड देत हे संस्कृतिसंचित जतन केले. अर्थातच धार्मिक ग्रंथ व संतसाहित्याचे वाचन-भजन-संकीर्तनाचा घरातून झालेला संस्कार हाच बोरकर-रामाणींच्या प्रातिभधर्माचा गाभा ठरतो. पण काव्यवृत्ती अंतर्मुख व धीरगंभीर असल्यामुळे रामाणींची कविता काहीशी गूढ अंगाने जात लौकिक जगण्यामधले अध्यात्म शोधत राहिली व मराठी कवितेच्या कोणत्याही प्रवाहामध्ये न पडता अखेरपर्यंत स्थितप्रज्ञतेनेच अभिव्यक्त होत राहिली हे तिचे वैशिष्ट्य.

मराठी काव्याचा एकंदर विचार केल्यास संतसाहित्याच्या काळापासून त्यातील भावकवितेची परंपरा लक्षणीय ठरल्याचे दिसते. तांबे, बालकवी, अनिल, मर्ढेकर, पु.शि. रेगे, बोरकर, आरती प्रभू, विंदा, बापट, पाडगांवकर, इंदिरा संत, शांता शेळके, ग्रेस अशा प्रतिभावंतांनी भावकवितेला समृद्ध केले. या परंपरेतील 'भावकवी' म्हणून शंकर रामाणींचा नामनिर्देश करावा लागतो. अर्थात या परंपरेची पाईक असणारी रामाणींची कविता स्वत:चे अनोखेपणही जपते. वेगळा काव्यविषयक विचार करते, वेगळे प्रतिमाविश्व साकारते, प्रादेशिक विविध संदर्भ व निसर्गसंवेदनांच्या नाविन्यपूर्ण नजाकती त्यामधे येतात. तिचे प्रेमकवितेचे हळवे पाऊलही वेगळ्या वाटेने पडणारे असते. तरल आत्मिक जाणिवांमधून आलेले तटस्थ जीवनचिंतन व आध्यात्मिक मूल्यजोपासना ही कविता करते. वैशिष्ट्यपूर्ण ऋतूसंवेदनांनी ती नखशिखांत नटली आहे. आशयगर्द नवीन

शब्दांच्या जोडण्या- घडवणुका, नवीन संकल्पना, प्रादेशिक बोलीभाषेतले अनेक संदर्भ व प्रत्ययकारी प्रतिमांमधून आविष्कृत होणारी स्वत: ची वेगळी काव्यभाषा ही रामाणींची 'रमणीय' काव्यशैली' आहे. या कवितेकडे आज इतक्या वर्षांनी पुन्हा नव्याने पाहताना अशा विविध अभ्यासअंगांनी ती समजून घेतली पाहिजे.

****

बालपणापासून भावनिक प्रतिकूलतेने व्यापलेले आयुष्य, घनव्याकुळ दु:खभावना, खोलवर मुरलेले आर्त, या अवघ्या भावतिमिरातून उजळलेले आत्मसाक्षात्काराचे दिवे, तीव्र मनोबलाचा उजेड आणि कोणत्याही परिस्थितीत उजेडाच्याच दिशेने पावले टाकणारी उदंड इच्छाशक्ती हे रामाणींच्या काव्यायुष्याचे सारसंचित व तेच त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्यही.

शंकर पांडुरंग रामाणी यांचा जन्म २६ जून १९२२ रोजी गोव्यातील बार्देश तालुक्यातील वेरे या गावी झाला. फोंडा तालुक्यातील वाडी-तळावली हे त्यांचे मूळ गाव. सुसंस्कृत सारस्वत कुटुंब. घरात देवधर्म-भजन-पूजनाचे समृद्ध सांस्कृतिक वातावरण. आईच्या जात्यावरच्या ओव्या-अभंग-गाण्यांचा बराच प्रभाव व मावशीचा प्रेमळ सहवास त्यांना लाभला होता. वडील नदीपरिवहन खात्यात अधिकारीपदी नोकरीला होते. उत्तम वाचक, नाट्यरसिक व तबलावादक होते. मात्र ते बरेच तापट व कडक शिस्तीचे होते. एक महत्त्वाची गोष्ट अशी, की शालेय शिक्षणात रामाणींना फारसा रस नव्हता. रडतरखडत कसेबसे मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाले होते! 'मुदलीच अभ्यासाशी न जुळलेले नाते', 'मुदलीच नापीक माती' हे त्यांनी कवितांमधून स्वत:साठी वापरलेले शब्द आहेत. विविध नियतकालिके घरी येत. अनिल,माधव ज्यूलियन, ना.घ. देशपांडे, कुसुमाग्रज, दा.अ. कारे, बोरकर असे अनेक कवी आवडू लागलेले. संतसाहित्य व आध्यात्मिक ग्रंथांचे वाचन व वाङ्मयीन व्यासंग होता. अशा पार्श्वभूमीवर वयाच्या १४-१५ व्या वर्षीच रामाणी लिहू लागले.

शालेय वयापासून कविता जवळ आली खरी, पण वडिलांच्या कडक शिस्तीचे पडसाद मनावर तीव्रतेने पडून बरेच क्लेशकर होऊ लागले होते. त्यांच्या दुराग्रही स्वभावामुळे कोवळ्या कविमनाची घालमेल होऊ लागली होती. यातच १९३९ साली रामाणींची पहिली कविता 'प्रकाश' या साप्ताहिकात प्रसिद्ध झाली. पुढे 'किर्लोस्कर'मध्ये एक कविता प्रकाशित होऊन तिचे मानधन म्हणून मनिऑर्डरने आठ आणे आले तेव्हा 'आज तू आपल्या घराण्याची अब्रू घालवलीस' असे म्हणून वडील त्यांच्यावर कडाडले होते! शिक्षणात उपद्रवी ठरणारा कवितेचा नाद वडिलांना पटण्यासारखा नाही आणि यांना तर कवितेचे मोरपीस सापडलेले अशी भावविश्वाची फरफट व शिक्षणात अपयश, व्यवहारशून्यता अशा गोष्टींमुळे खूप परवड वाट्याला येत गेली. परिस्थिती बिकट बनत गेली. व्यवहाराने म्हणावे कवितेमुळे परवड झाली व कलंदरीने म्हणावे कवितेने तारू

वाचवले, अशी एकूण स्थिती होती..

अशा प्रतिकूलतेमधून वाट काढत, रडत-रखडत कसेबसे मॅट्रिक पदरात पडले व लगेचच वडिलांच्या आज्ञेबरहुकूम त्यांच्याच नदीपरिवहन खात्यात कारकुनाची नोकरी धरावी लागली. पुढे वडिलांच्याच इच्छेनुसार, त्यांनी ठरवलेल्या वेळी, त्यांनी ठरवलेल्या मुलींशी लग्न व पणजी परिसरात बिऱ्हाडू संसार सुरू झाला. तो फार सौख्यकर नाही असा व जेमतेम परिस्थितीतच होता. त्यातच काही वर्षांनी पत्नीचे गंभीर आजारपण उद्भवले व आकस्मिकपणे आजारपणात तिचा दुःखद मृत्यू. तीव्र उदासीची छाया, कौटुंबिक ताणेबाणे- त्यातून वाट काढत उर्वरित वाटेवर सोबतीसाठी म्हणून दुसरा विवाह- द्वितीय पत्नी लीला यांच्याशी मात्र सहजीवनाचा सुखद अनुभव त्यांना मिळाला.. पण तोवर परिस्थितीचे भोग कायमचे चिकटलेले. मूळ घरी फारसे वास्तव्य न घडता इथे-तिथे बिऱ्हाडू संसार झाला. सेवानिवृत्तीनंतर तर पत्नीच्या नात्यात, मेहुणीच्या देखरेखीत बेळगाव-शहापूरला आळवण गल्लीत बिऱ्हाड... अपत्यप्राप्ती नव्हती, तब्बेतीचे सततचे अस्वास्थ्य, कार्यक्षमता खूप कमी, दृष्टी अधू.... ही सगळी एक आयुष्यभराची व्यथामालिकाच होती!

कवितेची निर्मितिप्रक्रियाही अजब होती. पत्नीचे गंभीर आजारपण व तातडीची वेळ.. ''१५ जुलै १९७० हा तो दिवस. माझी (प्रथम) पत्नी खूप आजारी होती. तिला हार्टडिसीज तर होताच, पण काही नवीनच आजार उद्भवला होता. तिला खूपच त्रास होऊ लागला. ताबडतोब हॉस्पिटलमध्ये घेऊन जाण्यासाठी ॲम्ब्युलन्स आणायला आमचा शेजारी गेला. तेव्हा मी त्यांची वाटच पाहत बसलो होतो. आत बायको अक्षरशः तळमळत होती. वेदनांनी ओरडत होती. अत्यंत निराशेचा असा तो क्षण होता. आणि... आणि मला कविता आली! आपोआप आली. त्याचा या घटनेशी संबंध असेल किंवा नसेलही. कुणाला ठाऊक? त्या ओळी मनातून निसटून जाऊ नयेत म्हणून हाताला मिळाला त्या कागदाच्या चिटोऱ्यावर खरडली.. 'दिवे लागले रे, दिवे लागले रे, तमाच्या तळाशी दिवे लागले!' व्यावहारिक पातळीवर अशा गोष्टी तर्कसुसंगतही वाटणार नाहीत. त्यांना 'अकल्पित' किंवा 'अगम्य' असे म्हटले तरी मनात आल्यावाचून राहत नाही की गाढ अंधारामध्ये ओठावर उषासूक्त आणणारे हे कोणते पेटते फुलांचे प्राक्तन? हा कसला जलजाळ? हे कोणते गूढ तमाच्या तळीचे दीप..?

'एकल्याने गावे एकट्याचे गाणे परक्याचे नाणे खरे खोटे' असा एकटेपणाचा तीव्र सूर व काळीज हेलावणारी आर्तता रामाणींच्या कवितेला व्यापून राहिली आहे. निरंतर व्यथा-वेदना सोसणाऱ्या मनाला रामाणींनी 'व्यथालय' किंवा व्यथेचे घर असे म्हटले आहे, ज्या घरामध्ये दुःख कवीच्या कुशीत झोपले आहे अशी एक अनोखी कल्पना 'अलक्ष लागले दिवे' या कवितेत दिसते. एका सखोल चिंतनाच्या क्षणी 'अलक्ष' दिवे लागल्याच्या आत्मानुभूतीचा हा उद्गार आहे.

तमांत जीव गुंफितां सुदूर विश्व जागलें
तुला न पाहिलें; उरी तुझी प्रकाशपाउलें
नशेत स्वप्न वाहतें: उडून भागले थवे...
व्यथालयांत माझिया अलक्ष लागले दिवे

हे अंतरीचे 'अलक्ष' भक्तीदिवे आहेत! 'अलक्ष' हा शब्द अमृतानुभवाच्या प्रभावातून आला आहे. अविकारी, अप्रत्यक्ष, अदृश्य असेही 'अलक्ष'चे अर्थ आहेत. 'अलख निरंजन'मधील 'अलख' म्हणजेही 'अलक्ष'च. रामाणींचे 'अलक्ष' दिवे अदृष्टाचे, अज्ञातात लागलेलेही आहेत. शिवाय सश्रद्धतेचे हे दिवे, ज्यावगैरे मोजमापांमधे गणती होऊ शकत नाही असे 'अ-लक्ष' दिवे असेही त्याचे एक अर्थवलय आहे.

बहुतांश वेळा निसर्गचित्रांमधून भाव-भावनांचे प्रकटन करणारे एक वेगळे अनोखे प्रतिमाविश्व हे रामाणींच्या काव्याचे ठळक वैशिष्ट्य 'उन्हाचे आरसे झाले', तीन उन्हाचे दगड ठेविले आणि रांधले जिणे', 'सांज दाटली विटकररंगी वत्स उन्हाचे अंग चाटते श्रांत धरेचे', 'चमचाभर जीणे जगताना', 'अपंगाला लाडकी लेक तशी उत्तरेला एक थोटी खिडकी, वैशाखातच मी गं लावल्या उन्हाच्या लखलखत्या बागा', 'माझिया दारात चिमण्या आल्या', अशा एक सो एक प्रतिमांच्या पदन्यासाने रामाणींची कविता सजली नटली आहे.

निराकाराचे झाड, चेतनेचे मोर, निळे तंद्रीचे उखाणे, मनामनाची मुकुंदमिठी, मी-तूच्या मधे झुलणारा आहे-नाहीचा हिंदोळा, पंखाना झालेला गगनडंख, झंझाळ झडीचा हुल्लड आषाढ, काळजाचे घर लोण्याहून मऊ अशा मनसुंदर रम्य कल्पनांनी ही कविता देखणी व आशयघन झाली आहे.

आयुष्यात दाटलेला काळोख इथेववेगवेगळ्या रूपांमधे, वेगवेगळ्या छटांमधे कवितेत येतो. काळोखाचे कावळे दु:खाचे कर्कश रूप दाखवतात. अंधाराची स्तने, काळखाचा काटा, काळोखाचा क्रूस, काळोखाचे काळवीट, काळे कावळे मांजर अशा काळोखप्रतिमा येतात. काळोखाच्या डोळ्यातून 'प्रकाशाचे रडे' येते. चित्र-विचित्रांनी नटलेला काळोख उजेडाचे दान पदरात टाकतो ही सकारात्मकता महत्त्वाची!

सुख, समाधान, सार्थक, संतोष, साक्षात्कार अशा अनेक आत्मिक जाणिवांचा तरल काव्यात्म आविष्कार म्हणजेच आध्यात्मिक अंगाने जीवनाचा संतुलित विचार रामाणींनी कवितेत केला. त्यांच्या कवितेतील ही आध्यात्मिकता मराठी कवितेत वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

'ऐन तापत्रयी भर्जरली काया, अत्तरला फाया वेदनेचा', 'मला अभाग्याला घडे अज्ञाताचा अभिषेक' असा सोसण्यापासून सार्थकापर्यंतचा जीवनप्रवास कवितेतून झालेला दिसतो. दु:खाची अटळ अपरिहार्यता स्वीकारून त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग सकारात्मकतेने शोधावा लागतो. आंतरिक बळाने त्या दु:खाचा सामना करावा लागतो.

हे सारे कवितेत वेगवेगळ्या पद्धतीने येते. आपल्याच वाट्याला हे का आले याचा शोक करत न राहता 'लक्ष वेदनांच्या पुण्याईचे बळ पंखातुन कळ आकाशाची' याप्रमाणे दु:खातून बाहेर पडण्याची आस कवितेत येते. शिवाय दु:ख-व्यथा-वेदना ही उद्वेगाने न सोसता सात्त्विकभावाने इथे सोसलेली दिसते. 'पोळलेल्या पावलांची आपसूक झाली वीट' असे म्हणताना पोळल्या पावलांच्या या वीटेवर ईश्वराने क्षणभर तरी उभे राहावे व आयुष्याच्या रणरणीला विश्राम मिळावा अशी संयत व सात्त्विक भावना येते. आज अफाट वेगवान झालेल्या तंत्रयंत्रयुगात अनेक प्रकारच्या बाह्य संघर्षांना तोंड देताना मनाची होणारी फरफट हरक्षण अनुभवास येते. विविध ताणतणावांचा सामना हरघडी करावा लागतो. अशा अंतर्बाह्य कोलाहलामध्ये मनाची शांतता, सत्त्वगुण व संयतपणा झाकोळला जातो. मनाचे निरामयत्व जवळजवळ अशक्यप्राय झाले आहे अशी परिस्थिती आज आपल्याभोवती आहे. असे असताना कलासाधना ही एक गोष्ट मात्र अशी आहे की ती या अंतर्बाह्य कल्लोळावर एक हळुवार फुंकर घालते. शब्द किंवा सर्जनशील साहित्य हे असे एक माध्यम आहे की जे आतला आकांत घेऊन उमटते व बाह्य विरोधाभासाची मनाला जाणवणारी तीक्ष्ण धार सुसह्य करते. कविता हा असा एक साहित्यप्रकार आहे की जो थेट आत्म्याला जाणवणाऱ्या सुखदु:ख संवेदनांना वाट मोकळी करून देतो. आतली घुसमट शब्दांत उतरणे, हा दु:खावरचा उतारा. कविता हाती फुलून येणे, हे सुखाचे लोभस रूप कविताच खुलवून दाखवते. पण यासाठी आवश्यकता असते ती फक्त अखंड धावण्याच्या शर्यतीतून क्षणभराचा विसावा घेण्याची, मिळवण्याची! ध्यान, योग या गोष्टींची अपरिहार्यता इथे आहे. ताणतणाव झेलण्याकरता, चित्त व चित्तवृत्ती प्रसन्न राहण्याकरता क्षणभराच्या विसाव्याशी मनाचा 'सं-योग' आवश्यक आहे. रामाणींची कविता नेमकी इथेच कामी येते. चार 'हिरव्या हिरव्यागार हुरमुजी' शब्दांच्या नि दोन 'अलक्ष कळांच्या' दिलबहार ओळींमधे ती रणरणत्या मनाला हाच 'पांचवाकंच' विसाव्याचा क्षण देऊ शकते. मनाचा असीम शांततेशी, सात्त्विकतेशी 'सम्यक योग' जोडून देते! 'पोळलेले पुण्य गळामिठी घाली / पुंडलिका भेटी परब्रह्म' किंवा 'अनंताची मिठी रोमरोमी' अशा आत्मिक समाधानाच्या शब्दांनी ती अंतर्बाह्य कोलाहलाशी सुसंवाद करते. त्यातून सुटण्याचे तरल मार्ग दाखवते. 'तीव्र वैशाखाच्या झळा ग्रीष्म झाले रोमरोम/ कधीतरी पाझरावे गर्द आषाढात व्योम' अशी निर्झरनिर्मळ आस निर्माण करते. गाढ आत्मतंद्रीतून फुलणारे असे असंख्य अलवार क्षण या कवितेत गवसतात. 'जीणं वेचता वेचता किती ओंजळीत फुले / वारे वादळ सोसून झाड अष्टांगी मोहरे' अशी उत्कट हळवी फुले ही कविता पदरी टाकते. 'ऊन सोसुनी असे मनात काय माळिले / उष्ण ओंजळीतुनी सुगंध सर्व सांडले' ही भावात्मकता व अंतिम समाधान आयुष्याला लाभायला हवे तर रामाणींच्या कवितेजवळ क्षणभर थांबायला हवे!

रामाणींच्या कवितेत सभोवतीच्या निसर्गाच्या रंगरूपांतून, गोव्याच्या भूमीच्या

सौंदर्याचे वेगळ्या पद्धतीने केलेल्या वर्णनातून हे सारे साकार होते. रामाणींच्या कवितेत 'ठायी ठायी निथळण अर्थसावळा ओलावा' आहे तो हाच! जीवनाच्या अथांग नभाला असणारे 'भिऱ्यांचे निनावी पिसे' आहे ते हेच! बोलीभाषेच्या प्रभावातून आलेले असंख्य शब्द प्रादेशिकतेचे रम्य दर्शन घडवतात. 'रान अस्कडीच वाट हले काळजाचा मेणा', 'आकुळ पिकुळ डोळ्यांची भाषा मला बोलता येणारच नाही'असे म्हणताना या कवितेला गोमंतकाच्या लाल मातीचा गंध येत राहतो. उटंगार पाऊस, ओठी अरळणारे गाणे, पायाखालची मधुर माती, पालखीचे पेणे असे भूमीनिष्ठ शब्दप्रयोग कविताभर पखरलेले दिसतात. गोव्यातली चाफी, जाई, जुई इत्यादी फुलांची पखरण करत ही कविता 'एका चैत्रचुंबी फांदीला अलवार लटकलेल्या घरट्या'सारखी मनात आंदुळत राहते. 'श्रावणखुळे कोण गं आले', 'जा पौषपावलांनी आले समीप गाव', 'तुझ्या माझ्यामधे आहे गूढ कार्तिकाचा पूल', 'आषाढमिठीत अत्तरली माती' , 'चाफ्याहून तीव्र उन्हांचा वैशाखी घमघमाट' असे रंगरंगीले ऋतू कवितेत येतात. रामाणींचं हे ऋतूसंवेदन वेगळे वैशिष्ट्य म्हणावे इतके लक्षणीय आहे.

या सर्वाबरोबर रामाणींनी प्रेमकवितेचे एक तरल मोरपीसही रसिकांच्या हाती दिले आहे. 'त्वचेच्या वाटेवरल्या वळणाची जातच जगावेगळी' अशी त्यांची प्रेमाची व्याख्या आहे.

'तुझे माझे नाते केळपान न्हाते धुते / केळपानावर ओली पौषउन्हाची तिरीप/ तशी येतेस समीप'

अशी तरल भावुकता प्रेमकवितेत आहे. निरंतर गाढ व्यथासनात बसलेली व एकटेपणाची वैशाखव्यथा पांघरलेली रामाणींची भावतरल आध्यत्मिक जाणिवांची कविता प्रेमाचेही सगळे विभ्रम असोशीने माळून घेते.

'चिमणे, चिमणे जपून ये/भरलें अंगण टिपून घे'

या चिमण्या शब्दांच्या, आनंदाच्या, कल्पनांच्या, अर्थांच्या, कवितेच्या आहेत. बदलत्या युगात, जगण्याच्या नवीन प्रवाहात ही प्राचीन सुगंधमयी कविता निश्चितच एक नवी जीवनजाणीव देऊ करणारी आहे.

एकनिष्ठ काव्यसाधनेचे व्रत रामाणींनी जीवनव्रत म्हणूनच श्रद्धेने जोपासले. त्या गाढ आत्मतंद्रीमधे हा 'काळोखाचा कवी' आयुष्यभर तल्लीन राहिला. त्यांच्या कवितेला त्यांच्या जन्मशताब्दीवर्षात पुन्हा एकवार उजाळा मिळून 'तमाच्या तळाशी दिवे' लागण्याचा प्रत्यय मराठी रसिक पुन्हा एकदा नव्याने घेतो आहे व या कवितेचे ज्येष्ठ प्रातिनिधिक मूल्य पुन:स्थापित होते आहे, ही आपल्या भाग्याची गोष्ट आहे.

**– डॉ. अनुजा जोशी**

भ्रमणध्वनी : ७७२१८१०९८६

# ना.धों. महानोरांची कविता

## डॉ. मधुकर केशव वर्तक

नांदेड येथे १९६० साली भरलेल्या मराठी कविसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून प्रा. वा.ल. कुलकर्णी म्हणाले, की 'आजच्या बहुसंख्य कवितेला स्वत:ची भाषा सापडलेली नाही. ती बा.सी. मर्ढेकर, पु.शि. रेगे, विंदा करंदीकर, वसंत बापट, मंगेश पाडगावकर यांच्या भाषेत अवतरते. त्यामुळे बहुसंख्य कवितेचा तोंडवळा एकसारखाच भासू लागला आहे. साचेबंदपणा येऊ लागला आहे. कल्पनाकृतीलाच कविता मानले जाऊ लागले आहे. कल्पनाकृतीच्या ठिकाणी असणारी बनावट, सजावट, कृत्रिमता, खोटी परिणामकारकता येथेही जाणवू लागली आहे.' असे नाना आक्षेप १९६० पूर्वीच्या आणि नंतरच्या आधुनिक मराठी कवितेसंबंधी वा.ल. कुलकर्णी यांनी घेतले आहेत. तथापि, वा.ल. कुलकर्णी यांचे हे मत पूर्णांशाने घेता येणार नाही. आशय आणि अभिव्यक्तीच्या संदर्भात जाणिवांमध्ये क्रांतिकारक बदल साठीपूर्वी आणि साठोत्तर कवितेमध्ये झाला. पांढरपेशे संदर्भ मागे पडून तळागाळातील ग्रामीण, शोषितवर्ग, कामगार, शेतकरी, मजूरवर्ग कवितेच्या केंद्रस्थानी आला. त्यामुळे साहजिकच अभिव्यक्तीची भाषा, रचना, ठेवण बदलली. एका कालखंडातून दुसऱ्या कालखंडात प्रवेश करताना कवितेला काही प्रमाणात जुन्या कालखंडातील घटकांचे बोट धरून यावे लागले. तसे करताना वास्तववाद आणि कल्पनाकृतीला अभिव्यक्त होण्यासाठी नव्याने शब्दसामर्थ्यांचा शोध घ्यावा लागला. हा शोध लगेचच पूर्ण होण्यासारखा नव्हता. कवितेचा तोंडवळा एकसारखा असणे हा आक्षेप लोकवाङ्मयातील आणि संतसाहित्यातील रचनेबाबतसुद्धा घेता येण्यासारखा आहे; पण तसे होत नाही. कारण ईश्वराप्रती असलेली प्रेमभावना रचनेच्या आशय आणि अभिव्यक्तीकडे काही प्रमाणात काणाडोळा करायला भाग पाडते.

१९४५ ते १९६० या कालखंडातील कवितेसंबंधी डॉ. वसंत पाटणकर, स्थूलमानाने तीन प्रवाह स्पष्ट करतात. एक व्यक्तिलक्ष्यी कवितेचा प्रवाह, दुसरा समूहलक्ष्यी कवितेचा प्रवाह आणि तिसरा सौंदर्यलक्ष्यी कवितेचा प्रवाह. बा.सी. मर्ढेकर

यांची कविता व्यक्तिलक्ष्यी प्रवाहातील आहे. हा प्रवाह या कालखंडात विशेष प्रभावी आहे. शरच्चंद्र मुक्तिबोध यांची कविता समूहलक्ष्यी प्रवाहाचे प्रतिनिधित्व करते, तर पु.शि. रेगे यांची कविता सौंदर्यलक्ष्यी प्रवाहाचे प्रतिनिधित्व करते. या कालखंडात हे तीनही कवी प्रभावी असले तरी महत्त्वाचा म्हणता येईल असा मुख्य प्रवाह मर्ढेकरांच्या कवितेने निर्माण केला. मर्ढेकरांच्या व्यक्तिलक्ष्यी कवितेचा म्हणजेच आधुनिकवादी कवितेचा प्रवाह इतर प्रवाहांतील कवितेवर पडला असे मत डॉ. वसंत पाटणकर नोंदवतात. ते मान्यच करावे लागेल. केशवसुतांच्या काळापासून १९६० पर्यंत मराठी कवितेवर रोमँटिसिझमचा प्रभाव राहिला. केशवसुती संज्ञेतल्या रोमँटिसिझमला मराठी मातीतल्या रोमँटिसिझमचे भान देण्याचे काम कुसुमाग्रजांच्या कवितेने केले. कुसुमाग्रजांच्या काव्याभिव्यक्तीतला रोमँटिसिझम काव्यप्रवाहात समाजवादी जाणिवेकडे जाताना दिसतो, असे मत कवी नामदेव ढसाळ व्यक्त करतात. या कालखंडातील कविता संतवाङ्मयातून आलेला द्वैत-अद्वैतवाद, संस्कृत भाषेतून आलेला अभिजातवाद, युरोपीय संस्कृतीतून आलेला रोमँटिसिझम, फ्रेंच राज्यक्रांतीतून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसूत्रीचा स्वीकार करायला लावणारा अस्तित्ववाद, मार्क्सवाद आणि रशियन राज्यक्रांतीतून आलेला समाजवाद, वास्तववाद यांचे संस्कार स्वीकारून आणि पचवून समृद्धीकडे वाटचाल करती झाली. ही वाटचाल पुढील काळात स्त्रीवाद, रूपवाद, संरचनावाद आदी मनोविश्लेषणात्मक साहित्यनिर्मितीची द्वारे उघडायला समर्थ ठरली.

साठोत्तरी मराठी कविता नव्या जाणिवा घेऊन आली. नवा आशय, नवी संवेदना आणि अभिव्यक्तीचे सतत बदलत जाणारे प्रकार यांनी आधुनिक कवितेची कक्षा जरी रुंदावली गेली तरी मुक्तछंदाचा अती आणि मोकळेपणाने झालेला वापर कवितेच्या पद्यस्वरुपाविषयी काही प्रमाणात शंका आधुनिक कवितेच्या संदर्भात व्यक्त झाल्या.

साठोत्तरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कवितेवर प्रभाव होता तो केशवसुतांचा. त्याच्या जोडीला रोमँटिक वास्तवतावाद, रविकिरणमंडळाची सौंदर्यवादी कविता आणि मर्ढेकरांची वास्तववादी दृष्टी या साऱ्यांचाच विचार करावा लागेल. याच काळात नारायण सुर्वे आपल्या जगण्यातला, अनुभवातला सच्चेपणा कवितेतून व्यक्त करत होते. त्यांनी कामगार, शोषितवर्गाचे जगणे आपल्या कवितेतून व्यक्त करताना रचनेमध्ये रोखठोक शब्दकळा आणि सडेतोड भाषा वापरली. त्यांची भूमिका साम्यवादी आणि समाजाभिमुख अशीच होती. नामदेव ढसाळांनी दलितशोषणाविषयी कळवळून लिहिले. शोषित समाजाच्या जगण्यातील दाहकता वाचकांच्या परिचयाची केली. ती दाहकता आजही वाचकाला अस्वस्थ करते. नारायण सुर्वे आणि नामदेव ढसाळ हे दोघेही केशवसुतांसारखेच रोमँटिक वास्तवतावादी कवी आहेत. त्यांनी कवितेत आक्रमकपणे

कामगार, शोषितांची समाजव्यवस्था बदलण्याचे स्वप्न पाहिले.

मौखिक परंपरा, लोकसाहित्य, लोकगीते, संतवाङ्मय, संतपरंपरा, तंत म्हणजे शाहिरी परंपरा, आधुनिक मराठी कविता ते नवकविता असा कवितेचा प्रवास रेखाटता येईल. कविता प्रत्येक कालखंडात टप्प्याटप्प्यावर कशी कशी बदलत गेली याचे दर्शन होते. मराठी कवितेचा प्रवास अधोरेखित करताना प्रा. रवींद्र घवी यांनी 'अध्यात्मवाद, सुधारणावाद, आदर्शवाद, नवमतवाद, गांधीवाद, अनुभववाद, (दलितसाहित्यासंबंधी) साहित्य क्षेत्रातील गूढवाद, अभिजाततावाद, सौंदर्यवाद आणि वास्तववाद आणि मार्क्सवाद इत्यादी विविध वादांच्या छायेतून प्रवास झाला आहे' असे मत व्यक्त केले आहे. पाश्चिमात्य साहित्याच्या प्रभावाकडून या मातीच्या खाणाखुणा स्पष्ट करणाऱ्या 'देशीमता'च्या सच्चाईपर्यंत आजची कविता विकसित झाली आहे. 'ओवी, अभंग, जातीवृत्ते, अक्षरगणवृत्ते आदी पारंपरिक रचनाप्रकारांतून आपल्या अस्सल मराठी कवितेचा जन्म झाला आहे. लोकसाहित्याला आणि मौखिक परंपरेला जवळची असणारी कविता गेल्या हजार वर्षांपासून मराठीत लोकप्रिय असल्याचा इतिहास आहे. श्रेष्ठ दर्जाच्या अलौकिक आणि अद्भुत वाङ्मयाची आपल्याकडची परंपरा ही अडीच हजार वर्षापासूनची आहे.' असे मत वि.का. राजवाडे यांनी नोंदवले आहे.

या पार्श्वभूमीवर ना. धों. महानोर १९६०च्या आसपास लिहू लागले. त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'रानातल्या कविता' १९६७ साली प्रसिद्ध झाला. मराठी काव्यात महानोरांची ओळख निसर्गकवी, प्रेमकवी, ग्रामीणकवी, सामाजिक भान असलेला कवी, शेती-शिवाराचे संदर्भ घेऊन वावरणारा कवी, म्हणून कायम झाली. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही अंगांनी महानोरांची कविता लोकगीताच्या, संतसाहित्यातील परंपरेशी जवळीक साधताना आढळते. ती लयबद्ध आहे. तिचा गंध, बाज, छंद, बंध, भाषा, घाट, रचना, त्यातील प्रतिमा, निसर्ग आणि सामाजिक भान, शैली, आशय व अभिव्यक्ती आदींचा विचार करता आधुनिक आणि समकालीन कवितेच्या कालखंडात ना. धों. महानोर यांच्या कवितेने आपला स्वतंत्र ठसा उमटवला आहे. त्यांच्या कवितेला मौखिक परंपरा, संतवाङ्मय, ज्ञानेश्वर-तुकारामाची कविता, केशवसुत काळातील कवी, रविकिरणमंडळातील कवी आणि मर्ढेकरयुगातले कवी तसेच बा.सी. मर्ढेकर, मुक्तिबोध, अनिल, पु.शि. रेगे, बा.भ. बोरकर, विंदा करंदीकर, कुसुमाग्रज, वा.रा. कांत, इंदिरा संत, भालचंद्र लोवलेकर, वसंत बापट, मंगेश पाडगावकर इत्यादी पूर्वसुरींची जबरदस्त ओळख आहे. चिंतन, मनन आणि विचार याचे अधिष्ठान आहे. ना.धों. महानोर यांचे वाचन शालेय जीवनापासून आजतागायत चालू आहे. ज्ञानेश्वरांपासून केशवसुतांपर्यंतच्या यापूर्वी मराठीतील बरीच कविता त्यांनी वाचली आहे. ते आपल्या आत्मनिवेदनात म्हणतात, 'मर्ढेकरांची

कविता नवी कविता म्हणून पुढे आली. त्या अगोदरच्या पिढीतल्या कुसुमाग्रज, कांत, बोरकर, पु.शि. रेगे, ना.घ. देशपांडे, इंदिरा संत इत्यादी मान्यवर कवींच्या कवितेचा तोंडवळा साफ बदलला. स्वत:च्या कवितेच्या प्रवृत्तीप्रमाणे प्रत्येक जण नव्या वाटा शोधू लागला.' ह्या कवींनी कालानुरूप नव्या पद्धतीची अभिव्यक्ती स्वीकारली आणि ही कविता ना.धों. महानोर यांनी वाचली तेव्हा तिच्या अंगभूत वेगळेपणाचा, अभिव्यक्तीच्या पद्धतीचा, प्रतिमांचा, गीतशैलीचा त्यांच्यावर परिणाम झाला, असे ते मान्य करतात. 'नव्या कवितेने सगळे काही दिले व मी कविता लिहू लागलो' असे म्हणत 'नवी चांगली कविता कित्येक दिवसांत वाचायला मिळाली नाही म्हणजे मी तुकारामाची कविता वाचतो. पुष्कळदा वाचूनही ती कविता मला प्रत्येक वेळी नवी वाटते' याची कबुली देतात.

संतवाङ्मयाबरोबरच लोकसाहित्य आणि मौखिकवाङ्मय याचा पगडा महानोरांच्या कवितेवर आहे.

पीठ पडे जात्यातून
तसं पाणी डोळ्यांतून
आई करपले हात
तुझे भाकरी भाजून
शिळ्या भाकरीनं उभा
माझ्या संसाराचा जीव
तुझ्या ओवीच्या शब्दानं
मला केलं चिरंजीव ('पानझड')

आईच्या मांडीवर बसून महानोर लोकगीताचे स्तन्य प्याले. महानोरांच्या वाङ्मयीन प्रवासात त्यांच्या कवितेत छंदवृत्ताचा वापर, गीतप्राधान्यता, लोकगीतसापेक्षता आणि ग्रामीण जीवन व्यक्त करणारी ग्रामबोली, शब्दकळा, लय जाणवते. महानोर निरिश्वरवादी आहेत, तरीपण त्यांच्या कवितेतून ईश्वरनिष्ठभाव ते सौंदर्यवाद, वास्तववाद याचे दर्शन घडते. महानोरांच्या कवितेचा सर्वांगीण अभ्यास करताना महानुभावपंथाच्या वाङ्मयापासून, ज्ञानेश्वर-नामदेवाच्या ओव्यांपासून तर त्या अगोदरच्या मौखिक आणि लोक-वाङ्मयातील लोकगीतापासून सुरुवात करावी लागते. महदंबेचे धवळे, नामदेव-ज्ञानदेवांची ओवी, एकनाथांची भारुडे, तुकारामाचे अभंग (कविता), आर्या, गौळणी, लावणी, विरहिणी-विराणी, शाहिरांचे पोवाडे आणि लावण्या, प्राचीन आणि अर्वाचीन कवितेतून शेतीशिवारे यांचे संदर्भ घेऊन आलेला निसर्ग, यातून पाझरत गेलेली लय, नाद, सूर, स्वर महानोरांच्या कवितेत उतरले आहेत.

लोकसाहित्यापासून संतसाहित्य, कृषिसाहित्य ते आजचे आधुनिक साहित्य यांचे प्रतिबिंब महानोरांच्या कवितेत कसे उमटले हे पाहणेही आवश्यक आहे. कारण हे सारे साहित्यिक विभ्रम महानोरांच्या लौकिक आणि वाङ्मयीन जीवनाशी निगडित आहेत. ज्या मातीत, भूमीत त्यांचा पिंड पोसला त्या मातीची पाळेमुळे त्यांच्या दोन्ही जीवनाला चिकटली आहेत. त्यामुळे त्यांच्या लौकिक आणि वाङ्मयीन जीवनाचे सारे संदर्भ एकमेकांत एवढे गुंतले आहेत की ते एकमेकांपासून वेगळे होऊच शकत नाही.

मराठी वाङ्मयात ना.धों. महानोरांची ओळख निसर्गकवी, प्रेमकवी, ग्रामीणकवी, सामाजिक भान असलेला कवी, शेती शिवारे यांचा संदर्भ घेऊन वावरणारा कवी म्हणून कायम झाली. त्यांचे अनुभवविश्व प्रत्यक्ष शेतीशी, मातीशी, रानाशी, तिथल्या झाडाझुडपांशी, पाना-फुलांशी निगडित आहे. त्यांच्या कवितेत वास्तवाचे दर्शन घडते, ते काल्पनिक स्वरूपाचे नाही. त्यांची कविता प्रत्यक्ष जगण्याशी नाते जोडून आहे.

ह्या शेताने लळा लाविला असा असा की
सुखदु:खाला परस्परांशी हसलो-रडलो.
आता तर जीवच अवघा असा जखडला
मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो

(रानातल्या कविता)

'रानातल्या कविता' या पहिल्याच काव्यसंग्रहातील पहिल्याच कवितेने ना.धों. महानोरांची कविता कोणत्या वळणावरून जाणार आहे हे स्पष्ट करते. महानोरांची सुखदु:खे, भावविश्व शेतीशी संलग्न असल्यामुळे त्यांचा संवाद रानाशी होतो. निसर्गाशी त्यांचे नाते एवढे घट्ट आहे की ते कवी म्हणून आणि व्यक्ती म्हणूनही निसर्गाच्या हिरव्या बोलीचा शब्द बनून जातात. त्यांच्या कवितेच्या अक्षावर निसर्ग आहे आणि परिघावर मानवीसंबंध दृढ झालेले आहेत. महानोरांचा लौकिक जीवनप्रवास ग्रामीण जाणिवांनी भारलेल्या कविमनाचाही प्रवास आहे. महानोरांच्या कवितेची भाषा साधीसरळ अशी स्वत:ची भाषा आहे. ती मराठमोळी आहे आणि भाषेत कृत्रिमता नाही. कवितेला बोलीभाषेचा हव्यास आहे. महानोरांच्या कवितेचे मूळ हालाच्या 'गाथा सप्तशती' या गाथेत सापडू शकते. गाथा म्हणजे कृषिवलाच्या जीवनगाथा. गाथा म्हणजे लोकगीतच. या गाथा कृषिकर्म करत असताना प्राचीनकाळी गायिल्या जात असाव्यात. या गाथेचा प्रभाव महानोरांच्या कवितेवर निश्चितच असणार. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी, 'महानोरांची कविता ही गाथा, लावणी आणि लोकवाङ्मयाचे सारे संस्कार पचवून समृद्ध होत गेलेली कविता आहे' असे म्हटले आहे, ते यथार्थच म्हणावे लागेल. हाल सातवाहनाच्या 'गाथा सप्तशती' मध्ये ग्रामीण कृषिसंस्कृतीचे स्वच्छंद

आविष्कार आढळतात; तसे ते महानोरांच्या कवितेतसुद्धा आढळतात, त्याचप्रमाणे महदंबेच्या 'धवळे'त गतिमानता आणि व्यक्तिदर्शनातील स्वाभाविकता आहे. या साहित्यगुणांशी, घटकांशी महानोरांची कविता नाते सांगते. 'धवळे'मधली शब्दांची सहजसुंदरता महानोरांच्या कवितेत येते ती ग्रामीण बोलीभाषेतून. तिच्यावर आपल्या परिसरातील ठसे आहेत.

नांगरून पडलेली जमीन सर्वत्र. नुसताच शुकशुकाट.
एखादे चुकार वासरू, कुठेतरी. उद्‌ध्वस्त घाट

आणि पुढे

ग्रीष्माचे उन्ह. ग्रीष्माचे उन्ह एकदा खेड्यावर आले.
खेडे उदास झाले.
घरात असेल तेवढे झोळीत टाकून स्वत: नागडे झाले.

(रानातल्या कविता)

ही कविता ग्रामजीवनातील समस्यांचे वास्तवदर्शन अगदी सोप्या शब्दांत घडवते. सामाजिक जाणिवा व्यक्त करणारी ही एकमेव कविता निसर्गातील जाणिवा स्पष्ट करणाऱ्या 'रानातल्या कविता' या काव्यसंग्रहात आहे. दुष्काळी खेड्याचे चित्रण रंगवताना कवीने पासरीभरी ज्वारीवर भोग देणाऱ्या रूपवंत पोरी याच खेड्यात पाहिल्या आहेत. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी म्हटल्याप्रमाणे ना.धों. महानोरांची कवितेची नाळ ओवी, लावण्या आणि लोकवाङ्‌मयाशी जोडली गेली आहे.

ओवी हा मौखिक वाङ्‌मयप्रकार कवीच्या परिसरात रोजच्या जीवनातील अविभाज्य भाग बनून व्यापला गेला आहे. त्यामुळे 'रानातल्या कविता'प्रमाणेच (१९६७) ना.धों. महानोरांचा दुसरा काव्यसंग्रह 'वही'मध्ये (१९७१) ओवी वाङ्‌मयप्रकाराचा कवितेत वापर झाल्याचे दिसून येते.

बोरी वो ऽ बाभळी
मायेच्या झाल्या नारी
– केळ कमळण
झाली प्रसूत दुपारी (रानातल्या कविता)

किंवा

| | |
|---|---|
| आंब्या साप्याचं | हिरव्या चाफ्याचं |
| नाव घेते वो ऽ | नाव घेते वो ऽ |
| चांद मोत्याचा | भांग मोत्याचा |
| भाळी चांदवा | माझ्या राजाचाऽ |
| | (रानातल्या कविता) |

ह्या ओवीच्या अंगाने लिहिलेल्या कवितेत पारंपरिक लोकगीताचा बाज जाणवतो. त्यात लोकसंगीतातील गद्यस्वरूप लय अनुभवता येते. ना.धों. महानोरांच्या या रचना मौखिक परंपरेतील

सोनियााचा पिंपळ
रत्नजडित गं पान
ज्ञानोबा महाराजांचं
आळंदीत ठाण

या भक्तिरसात तल्लीन करणाऱ्या ओवीरचनेची आठवण करून देतात. ना.धों. महानोरांच्या कवितेवर अशा प्रकारे लोकसाहित्याचे, कृषिसाहित्याचे, कृषिवलयाचे संस्कार जाणवतात. 'केळ कमळण झाली प्रसूत दुपारी' या चित्रात केळीची सोडवाट ठीक झाली असली तरी पित्याच्या मायेने आपण घाबरे होतो. 'या असल्या कवितांना ज्ञानदेवाच्या विराण्यांची नेमकी, मोजकी, नितळ आणि अर्थघन शब्दकळा लाभलेली आहे. नेमक्या, मोजक्या सौंदर्यघन शब्दांत रसरशीत चित्रे उभी करण्याचे महानोरांचे सामर्थ्य असाधारण आहे.' असे कविवर्य बा.भ. बोरकर नोंदवतात, ते समर्थनीयच आहे.

आधुनिक मराठी साहित्याच्या प्रारंभकाळापासून मराठी कवितेवर रोमँटिसिझमचा प्रभाव अधिक दिसून येतो. केशवसुत, बा.सी. मर्ढेकर, मुक्तिबोध, ना.घ. देशपांडे, पु.शि. रेगे, बी, रघुनाथ, आरती प्रभू, ग्रेस, विंदा करंदीकर, नारायण सुर्वे या कवींची कविता जीवनाला सामोरी जाताना दिसते. ती कविता ना.धों. महानोरांनी पूर्णपणे अभ्यासली. पण तिचे अनुकरण केले नाही. त्यासंबंधी नरहर कुरुंदकरांचे एक पत्र ना.धों. महानोरांना आहे. त्यात ते लिहितात, 'महाराष्ट्रातील ज्येष्ठ कवींच्या खाणाखुणा तुमच्या कवितेवर आहेत. तुमची कविता बहुधा अनुकरणापासून दूर आहे. ती स्वत:ची 'रूपवंता' आहे. चांगली आणि इतर कुणाची अनुकरण नसणारी कविता.' ऐन तारुण्यात लिहिलेल्या या सुरुवातीच्या काव्यसंग्रहांतील कवितेत निसर्ग, शृंगार याला प्राधान्यत्व आले आहे आणि त्यामुळे सामाजिक जाणिवा या दोन्ही काव्यसंग्रहांत अस्पर्शित राहिल्या. ना.धों. महानोरांच्या कवितेचे वर्गीकरण करताना प्रेमकविता, निसर्गकविता, सामाजिक आशयाच्या/जाणिवांच्या कविता, आध्यात्मिक जाणिवांच्या कविता, ग्रामीण ढंगाच्या कविता आणि अवांतर यामध्ये जीवनदर्शन दर्शवणाऱ्या कविता, खंडकाव्य यांचा समावेश करता येईल. एकूण ना. धों. महानोरांच्या कवितेचा प्रवास, सुरुवातीच्या कवितेमधला प्रणयजाणिवा तीव्रतेने स्पष्ट करणारा आहे. पुढे तो कवीच्या वयाबरोबर, अनुभवाबरोबर कमी कमी होत गेलेला आहे. स्फुटकवितेकडून दीर्घकवितेकडे वाटचाल झाली आहे. त्यातून 'गाथा शिवरायाची' (१९९८) व 'जगाला

प्रेम अर्पावे' (२००५) ही खंडकाव्ये जीवनदर्शन व्यक्त करणारी काव्ये लिहिली गेली आहेत. त्याद्वारे निसर्गप्रेमाकडून समाजभिमुखतेकडे कवितेचा स्पष्ट प्रवास अधोरेखित करता येणारा आहे. महानोरांचे 'अजिंठा' (१९८४) हे खंडकाव्य प्रेमाचे आहे. प्रेमाची कथा त्यात गुंफली असली तरी निव्वळ कथानक सांगणे हा ह्या खंडकाव्याचा मुळी उद्देशच नाही. रविकिरणमंडळाच्या काळात कथात्मक काव्याला बहर आलेला होता. कथानकाच्या पलीकडचे भावविश्व प्रकट करणे या 'अजिंठा' खंडकाव्याने साधले आहे. ना.धों. महानोरांच्या कवितेची रचना लयबद्ध आहे. त्यामुळे साहजिकच कविता गेयप्रधान आहे. सामाजिक जाणिवा स्पष्ट होण्यासाठी ना.धों. महानोरांनी गद्यप्रधान कवितेचा फॉर्म निवडला असावा. 'प्रार्थना दयाघना' (१९९०), 'तिची कहाणी' (२०००) आणि 'गंगा वाहू दे निर्मळ' (२००७) हे काव्यसंग्रह कवितेचा प्रवास मुक्तछंदाकडे जात असल्याचे स्पष्ट करतात. त्यामुळे पुढे पुढे रचनाबद्धतेकडून सुरू झालेला कवितेचा लयबद्ध प्रवास मुक्त अशा रचनाप्रधानतेकडे वळला. महानोरांनी आपल्या कवितेत प्रयोग करायचे म्हणून केले नाहीत. आपला आशय अभिव्यक्त करण्यासाठी त्या त्या वेळी आवश्यक असलेल्या फॉर्मचाच त्यांनी विचार केलेला दिसतो.

नापीक माळरानावर जन्मजात दारिद्र्यात
उदासवाणं जगणारं माझं खेडं, भटक्या विमुक्तांचं
या खेड्याची नाळ कधीच तुटली नाही आयुष्यात
आयुष्यात,
प्रत्येक पडझडीच्या काळात रक्तबंबाळ झालो.
निघून जावं म्हणून पुष्कळदा निघालो
पण इथल्या मातीनं
भरगच्च बेड्या टाकून मला बांधून ठेवलं

(गंगा वाहू दे निर्मळ)

कविव्यक्तित्वाची ओळख या रचनेमधून स्पष्ट होते. साहित्यिक हा प्रयोगशील असणे आवश्यक असते. काळानुसार प्रयोगशीलताच साहित्यिकाला जिवंत ठेवत असते याचे पुरेपूर भान ना.धों. महानोरांना आहे; म्हणूनच 'गाथा शिवरायाची' ह्या खंडकाव्यात त्यांनी ओवी, अभंग, कवन, भारुड, पोवाडा, पाळणा, धावा, लावणी या रचनाप्रकारांचा सुरेख वापर केला आहे. तो करताना बहुजन समाजाला समजेल अशा भाषेचा आणि रचनेचा त्यांनी वापर केला आहे.

'जात्याच्या पाळूचा कंठ झाला बाई जड
राजाविना देश समदं असूनी उजाड ।। '

या ओवीबद्ध रचनेमधून शिवरायांप्रती लोकभावना व्यक्त झाल्या आहेत. ही कविता कवीची असली तरी आतला भाव बाईचा आहे. इंदिरा संतांच्या ‘मालनगाथा’शी नाते सांगणारी ही महानोरांची गाथा आहे. तर,

संत आणि जन          उभे तुझ्यासाठी
पांडुरंगपाठी          कैवल्याचा

(गाथा शिवरायाची)

या अभंगरचनेवर तुकारामाची छाया आहे. अक्षरगणवृत्तातील भुजंगप्रयातात असलेले कवन

महाराष्ट्र देशी ध्वजा लावताना
शिवबा तुझा एक आधार होता

(गाथा शिवरायाची)

समर्थ रामदासांच्या श्लोकांची आठवण करून देते.

बुरगुंडा व्हईल बया ग ऽ
आता बुरगुंडा व्हईल

(गाथा शिवरायाची)

या रचनेवर एकनाथी भारुडाची छाप आहे. गाथा शिवरायाची असल्यामुळे त्या कालखंडातील पोवाड्याचापण सुरेख वापर झाला आहे.

शिवबाच्या हरहर शब्दांनी धगधगले हे सहा कडे
गाण्यामधला शब्द थरथरे लाल डफावर थाप पडे ।।

(गाथा शिवरायाची)

तर लोकसाहित्यातील पाळणा लोकगीताची आठवण करून देतो ती अशी,

या ग बायानो बांधू तोरण
सजवू पाळणा म्हणू या गाणं
पडू दे चांदणं तुझ्या जन्माचं
जो जो रे बाळा जो ।।

(गाथा शिवरायाची)

गाथेत ‘धावा’ झाला तो ईश्वराप्रती. ‘गाथा शिवरायाची’ लिहिण्याची प्रेरणा महानोरांना शिवछत्रपतींनी शेतकऱ्यांच्या संदर्भात केलेल्या कामांमुळे मिळाली. शिवरायांवर वीरश्रीयुक्त काव्यरचना लिहिण्यामागे

‘भिडविली एकदा मांड रतिभर ढळली नाही ।
मारिली एकदा टाच ती पुन्हा शिवविली नाही ।
रिकिबीचा चढता पाय थोडाही लवला नाही

अनिनीच्या झटक्यावरती
घोड्याला खुपवत होती
शर्यतीत धावत होती
तिज काय अडवी नदिओढा – फेकला तटाहुनी घोडा'

या दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी यांच्या 'झाशीची संग्रामदेवता' या खंडकाव्य व संग्रामगीत यांचे संस्कार आहेत. ते महानोरांवर विद्यार्थिदशेतच घडले. संतांनी प्रतिष्ठित केलेल्या काव्यरचनेशी महानोरांची नाळ जुळली आहे तशी ती केशवसुत कालखंडापूर्वीच्या आणि आधुनिक मराठी काव्याशीसुद्धा. केशवसुतांनी कवितेत निसर्ग आणला. बालकवींनी त्यात चैतन्य ओतले तर महानोरांनी त्या निसर्गचित्रांना त्यांची स्वत:ची एक देहबोली दिली. ना.घ. देशपांडे यांच्या 'रानावनात गेली बाई शीळ' किंवा 'नदिकिनारी, नदिकिनारी नदिकिनारी ग' या निसर्गकवितेने महानोरांना लयीचे भान दिले. ना.धों. महानोरांनी वेळोवेळी आपल्या मुलाखतीमधून, लेखनामधून त्यांच्या काव्याच्या प्रेरणांमध्ये ना.घ. देशपांडे यांच्या काव्यगुणांचा उल्लेख केला आहे. ना. धों. महानोरांच्या कवितेची लोकगीत लय, कवितेची ग्रामीण ढंगाची भाषा, कवितेची गेयता, शृंगारजाणिवांची युक्त अशी अभिव्यक्ती, खेड्यातला निसर्ग, तेथील माणसांचे व्यवहार, तेथले वातावरण, शेतीशिवाराचे संदर्भ इत्यादी गोष्टी त्यांना ना.घ. देशपांडे यांच्या कवितेतून रुंजी घालत राहिले. ना.धों. महानोरांच्या निसर्गचित्रणात शृंगाराची विपुलता आहे. त्यावर पु.शि. रेगे यांच्या कवितेची छाप आहे. बहिणाबाई आणि महानोर एकाच प्रांतातील असल्यामुळे असेल कदाचित, त्या दोघांच्याही कवितेवर लोकगीताचा पीळ आहे. दोघांनाही लोकसाहित्यातील प्रादेशिक फॉर्म गवसला आहे; असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. दोघांच्याही कवितेच्या अक्षावर निसर्ग आहे आणि परिघावर मानवी संबंध आहेत. फरक एवढाच की बहिणाबाईंनी कवितेच्या परिघावरील मानवी संबंध आध्यात्मिक पातळीवर तपासला, तर ना.धों. महानोरांनी तो शृंगारिक तत्त्वावर अनुभवला.

डोंगरी शेत माझं ग ऽ मी बेनू किती?
आडाचं पाणी बाई ग ऽ पाणी वढावं किती?

ह्या नारायण सुर्वेंच्या रचनेला लाभलेली अमरशेखांची वाणी ना.धों. महानोरांच्या कवितेला शाहिरीबाजेची प्रेरणा देऊन गेली. तर कवी गिरीशांची 'पोर खाटेवरी मृत्यूच्याच दारा, कुणा गरिबाचा तळमळे बिचारा' यासारख्या कविता सामाजिक जाणिवा पक्क्या करायला कारणीभूत ठरल्या. कुसुमाग्रजांच्या ऋगर्जा जयजयकार', 'पृथ्वीचे प्रेमगीत', 'अहिनकुल' या कविता; इंदिरा संतांचे काव्यसंग्रह; मंगेश पाडगांवकरांची भावगीते, प्रेमगीते; वसंत बापटांच्या लावण्या ना. धों. महानोरांना

मोहात पाडीत होते. महानोरांच्या कवितेचा पिंड या पूर्वसुरींच्या रचनेवर पोसला गेला. त्याचे सम्यक दर्शन त्यांच्या काव्यवाटचालीत आपल्याला पाहावयास मिळते.

**कवीचे लौकिक जीवन आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व**

कवी किंवा कलावंत यांच्या कलाकृतीचा अभ्यास करताना, कलाकृतीचा संपूर्ण आस्वाद घेताना, त्या कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करणे हा एक महत्त्वाचा भाग असतो. कलाकृतीचा शोध हा ती कलाकृती निर्माणकर्त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या शोधात दडलेला असतो. त्यामध्ये कविमनाचा, कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि संवेदनशील वृत्तीचा शोध आपण घेत असतो. कवीच्या बाबतीत हा शोध त्याच्या कवितेतील सामर्थ्यस्थानांचा, कवितेमागील प्रेरणा व भूमिकेचा शोध असतो. कलानिर्मितीचा विचार आपण करतो तेव्हा स्वाभाविकपणे कलाकृतीतून अभिव्यक्त झालेल्या कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाचाही विचार असतो. 'व्यक्तिमत्त्व' हा चरित्राचाच भाग असतो; फरक एवढाच की व्यक्तिमत्त्व ही संकल्पना मानसशास्त्रीय संज्ञा म्हणून आपल्यासमोर उभी ठाकते. एखाद्या किंवा अनेक वैशिष्ट्यांमुळे होणारे व्यक्तीचे स्वतंत्र दर्शन म्हणजे व्यक्तिमत्त्व. एखाद्या कलाकृतीचा अभ्यास करताना इम्पोलियन तेन याने म्हटल्यानुसार वंश, काळ आणि परिस्थिती यांचा कलाकारावर झालेला परिणाम लक्षात घ्यावा लागतो. कोणत्याही व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत त्याच्या जन्मापासून, काही वेळा तर जन्माआधीपासून घडणाऱ्या अनेक घटना, तो प्रदेश, तेथील निसर्ग, तेथील भाषा, लोकप्रवृत्ती, संस्कृती, समाजपिंड, लोकांच्या खाण्यापिण्याच्या सवयी, व्यसने, पोशाख, स्वभावविशेष; शारीरिक-मानसिक भावभावना असे अनेक संदर्भ मिसळलेले असतात.

आहार, निद्रा, भय आणि मैथुन या सर्वसाधारण भावना मनुष्य आणि मानवेतर प्राणी यांच्यात आढळतात. प्रत्येक सजीव प्राण्याला ही निसर्गाची उपजत देणगी आहे. हे 'व्यक्तित्व' सजीवांना प्राप्त झालेले आहे. मनुष्यप्राण्याला वर उल्लेख केलेल्या भावनांव्यतिरिक्त सर्वसाधारण विचार करायला लावणारी 'बुद्धी' ही आणखी एक बाब मनुष्येतर प्राण्यापेक्षा अधिक दिलेली आहे. त्यामुळे 'व्यक्तित्व' ही संज्ञा मानवेतर प्राण्यांना लागू पडते, तर मनुष्यप्राण्याच्या बाबतीत 'व्यक्तिमत्त्व' हा शब्द लागू पडतो. 'व्यक्तित्व' (Individuality) आणि 'व्यक्तिमत्त्व' (Personality / Identity) याचा व्यापक अर्थ लक्षात घेऊनच एखादा 'व्यक्तिमत्त्वाच्या शोधा'मध्ये 'व्यक्तित्व' आणि 'व्यक्तिमत्त्व' यांचीच सरमिसळ नाकारता येत नाही. कारण अनेक संशोधकांनी व्यक्तिमत्त्व आणि व्यक्तिमत्त्व हे दोन्ही शब्दप्रयोग एकाच अर्थाने वापरलेले दिसतात. (त्याचे दुसरे उत्तम उदाहरण म्हणजे 'प्रतीती' आणि 'प्रचीती' हे शब्दप्रयोग – दोन्हींचा

अर्थ अनुभव, विश्वास, खात्री असाच आहे.) कवीचे लौकिक जीवन आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. कवी आपल्या कवितेत स्वानुभव अभिव्यक्त करत असतो. त्यामध्ये त्याचे लौकिक जीवन, एकापरीने आत्मचरित्र किती आणि कोणते हे फक्त कवीच सांगू शकतो. पु.ल. देशपांडे यांनी 'मी आत्मचरित्र कधीच लिहिणार नाही' असे स्पष्ट करताना, वाचकांनी मी लिहिलेल्या प्रत्येक शब्दात हवा तर त्याचा शोध घ्यावा असे सांगून आत्मचरित्र ही बाब झटकली होती. साहित्यिकाचे लौकिक जीवन आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व एकमेकांपासून कधी दूर, कधी सरमिसळ अवस्थेत प्रतीत होत असतात – ते त्यांनी लिहिलेल्या वाङ्मयात. 'रसिकाला मूळ सत्याशी काही कर्तव्य नाही. त्याला हृदयंगम सत्याभास पुरे असतो', असे माधव ज्युलियन यांनी 'स्वप्नरंजना'च्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. असे असले तरी कलाकृतीची स्वतंत्रता आणि स्वायत्तता मान्य करूनही तिच्याकडे कलाकाराच्या व्यावहारिक चरित्राच्या आधाराने, लौकिक जीवनातील घटनांच्या साहाय्याने पाहण्याची आणि कलाकृतीचे मूल्यमापन करण्याची एक प्रवृत्ती असतेच. कवितेचे मूल्यमापन करताना एक गोष्ट ध्यानात ठेवणे आवश्यक आहे की कविता ही कवीच्या व्यक्तिमत्त्वाशी सरळ संबंध स्पष्ट करणारी कलाकृती नाही. एखाद्या कवीच्या कवितेचा अभ्यास व मूल्यमापन करताना कवितेत अभिव्यक्त झालेला अनुभवाचा सच्चेपणा, प्रामाणिकपणा, जिवंतपणा, वास्तवाशी राखलेले इमान, भोवताली घडणाऱ्या घटनांचे कवीच्या मनावर झालेले आघात आणि कवीने लावलेले अन्वयार्थ; व्यक्त झालेल्या कौटुंबिक–सामाजिक जाणिवा, राजकीय आणि सांस्कृतिक संदर्भ आणि या सगळ्याकडे पाहण्याचा कवीचा दृष्टिकोन याचा विचार करावा लागतो. त्यातून अभिव्यक्तीसाठी कवीची भाषा, शब्दकळा, बोलीभाषेचा वापर, तिचे नागर संस्कृतीशी असलेले नाते, वाक्प्रचार आणि म्हणींचा वापर, स्वानुभवाला न्याय देणाऱ्या प्रतिमा, वाक्यरचना, शब्दाला दिलेली क्रियापदरूपे आणि क्रियापदाला दिलेले शब्दरूप या सगळ्यांनी कवितेला दिलेला प्रवाहीपणा – गतिशीलता आणि नाद–लयीने कवितेला उपजत दिलेली मौखिकता, या सगळ्यांची चिकित्सा अभिप्रेत असते. ही चिकित्सा कवीच्या काव्याचे पूर्वसुरींशी असलेले नाते, प्रभाव, पूर्वसुरींच्या काळाचे भान आणि समकालीन रसिकतेचा कवीने केलेला अंदाज यांना व्यापून केली जाते.

'कवीच्या चरित्रातल्या घटनांशी कवितेचा संबंध माहीत होणे हे कवीच्या चरित्रदर्शनाला उपयुक्त ठरेल आणि मनोरंजकही वाटेल, पण त्याचा कवितेच्या रसग्रहणाला काही उपयोग नाही. कवीच्या जीवनात त्याला आलेले अनुभव आणि त्यांचे त्याच्या मनावर झालेले संस्कार ह्यामुळे त्याचे व्यक्तिमत्त्व घडत जाते आणि

त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन सिद्ध होत जातो. त्याचा आविष्कार त्याच्या काव्यातून होणे शक्य असते आणि कदाचित त्याच्या काव्याच्या गुणवत्तेवरही त्याचा परिणाम होतो. पण, कवीच्या चरित्रासंबंधीची ही माहिती त्याच्या काव्याच्या साकल्याने विचार करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल, पण त्याच्या प्रत्येक कवितेचा त्याच्या चरित्रातल्या एखाद्या प्रसंगाशी संबंध जोडणे रसग्रहणाला युक्त होईल असे नाही.' असे मार्मिक विवेचन रा.भि. जोशी यांनी केले आहे, ते महत्त्वाचे ठरते. कवीच्या लौकिक जीवनातील घटनांच्या आधाराने त्याच्या कवितेचे मूल्यमापन करणे सर्वस्वी अयोग्य म्हणावे लागेल. असे असले तरी कवीचे लौकिक जीवन आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व यांचे परस्परांशी असलेले गुंतलेपण लक्षात घेता कवीच्या लौकिक व्यक्तिमत्त्वाला कवितेच्या अभ्यासातून पूर्णपणे बाजूला सारणे कवी आणि कविता समजून घेण्याच्या दृष्टीने बरोबर होणार नाही. प्रणयपंढरीचे वारकरी माधव ज्युलियन यांची प्रणयजाणिवेने व्यापलेली कविता समजून घेताना समीक्षेने त्यांचे लौकिक जीवन दृष्टिआड केले नाही. त्यामुळे माधव ज्युलियन वाङ्मयीनदृष्ट्या आणि लौकिकदृष्ट्याही सदैव चर्चेत राहिले. तीच बाब राजकवी यशवंत यांचीही. माधव मनोहर यांनी यशवंत यांना 'दुःखाचे शाहीर' असे म्हटले आहे. कवी यशवंत यांच्या जीवनातील कंटाळवाण्या घटनांचा सतत उच्चार झालेला असल्यामुळे त्यांच्या कवितेवर हा शिक्का बसला असावा. बा.सी. मर्ढेकर यांच्या कवितेतील विषण्णतावादी सुराचा पुन्हा नव्याने अर्थ समजून घेण्यासाठी म.वा. धोंड यांच्यासारख्या समीक्षकाला मर्ढेकरांच्या चरित्रात्मक व्यक्तिमत्त्वाचा विचार समीक्षेत करावा लागला. कवीच्या प्रत्येक कवितेत त्याच्या चरित्रातील एखाद्या घटनेचा संबंध जोडणे रसग्रहणाच्या दृष्टीने योग्य होणार नसल्याचे मत रा.भि. जोशी यांनी व्यक्त केल्याचे आपण पाहिले आहे. रा.भा. पाटणकर यांनी 'सौंदर्यमीमांसा' या समीक्षाग्रंथात 'कवितेच्या मूल्यमापनासाठी किंवा तिच्यातील अनुभवांच्या प्रामाणिकपणाच्या मूल्यमापनासाठी कवितेच्या बाहेर जाण्याची गरज नाही.' यावर सातत्याने भर दिला आहे. यावरून कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध पाहिजे तेवढा सोपा नाही. तो अनेक उलटसुलट मतमतांतरे याने व्यापलेला आहे. कवी आणि त्याची कविता यांचे स्वरूप 'बिंब-प्रतिबिंब'सारखे आहे. कवीत कविता दडलेली आहे, असे आपण सहज म्हणतो. त्याचबरोबर कवितेतून कवी साकार होतो असेही म्हणतो, तेव्हा कवीचे लौकिक जीवन आणि त्याचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व याची एकरूपता अनुभवतो. आस्वादकाला यापेक्षा आणखी काय हवे असते? पण आस्वादक आणि अभ्यासक यामध्ये फरक आहे. आस्वादकाला अभ्यासक होणे गरजेचे नाही, तर अभ्यासकाला आस्वादकाच्या भूमिकेपासून दूर राहणे योग्य ठरणार नाही. या दुहेरी भूमिकेतून अभ्यासकाला कवीच्या लौकिक आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा धांडोळा घ्यायचा

असतो. कवीच्या लौकिक जीवनातील घटना, प्रसंग यांचा दस्तऐवज असेलच आणि असला तरी उपलब्ध होईल असे नाही. या अनुपलब्ध साधनांची उणीव कवीच्या संपूर्ण उपलब्ध कवितेच्या माध्यमातून भरून काढायची असते. कवीची कविता हेच संशोधनकार्यात महत्त्वाचे आणि अस्सल असे साधन ठरते. तेच साधन कवीचे लौकिक जीवन आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व यांचा आलेख रेखाटायला साहाय्यकारी ठरू शकते. मात्र कवितेसोबत कवीचे इतस्तत: ज्ञात झालेले जीवनचरित्र त्याचे व्यक्तिमत्त्व निश्चित करायला 'दुसरा आधार' ठरू शकतो. 'व्यक्तिमत्त्व घडण्याच्या प्रक्रियेत अनेक बाबींचा समावेश असतो. माणूस हा एका विशिष्ट भौगोलिक परिस्थितीत जन्माला येतो. जन्माला येताना तो मागच्या पिढ्यांचे गाठोडे सोबत घेऊन येतो. मागच्या पिढ्यांकडून आंदण मिळालेल्या ह्या गाठोड्यात त्याला उपयोगी पडतील अशी काही कसबे, काही प्रेरणा आणि सुप्त अवस्थेत घनीभूत झालेल्या वांशिक स्मृती असतात. इथे विशिष्ट भौगोलिक सामाजिक परिस्थितीत जगत असताना त्याच्यावर अनेक गोष्टींचे संस्कार होतात, केले जातात. येणाऱ्या प्रत्येक अनुभवानुसार व घडवलेल्या प्रत्येक संस्कारानुरूप त्याचे व्यक्तिमत्त्व घडत व बदलत जाते' प्रा. उत्तम क्षीरसागर यांच्या या निरीक्षणाचा व्यक्तिमत्त्वची लौकिक आणि वाङ्मयीन सांगड घालायला नक्कीच उपयोग होईल. कुठल्याही कवितेची मूलभूत बाब कवीला आलेले अनुभव हीच असते. आणि अनुभव व्यक्तिमत्त्वाशी निगडित असतात. कवीच्या कवितेचा आस्वाद घेताना त्या काव्यातून कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा गंध येत आहे की नाही हे जाणवणे महत्त्वाचे आहे.

पाऊस-पाणी, जमीन-शेतकरी, निसर्ग, आजूबाजूचे स्त्री-पुरुष, त्यांची सुखदु:खे, त्यांचा शृंगार, माणूस आणि माणुसकीला स्पर्श करणारी त्यांची श्रद्धास्थाने यांचा समावेश पुढील काव्यसंग्रहांत पाहावयास मिळतो.

१. रानातल्या कविता, २. वही, ३. पावसाळी कविता, ४. पळसखेडची गाणी (संग्रहित), ५. अजिंठा, ६. पक्ष्यांचे लक्ष थवे (प्रा. उत्तम क्षीरसागर संपादित ना.धों. महानोरांच्या १०० उत्तम कवितांचा संग्रह), ७. प्रार्थना दयाघना, ८. पानझड, ९. गाथा शिवरायाची, १०. तिची कहाणी, ११. जगाला प्रेम अर्पावे, १२. गंगा वाहू दे निर्मळ.

कविता हा महानोरांचा श्वास आहे आणि आजही तो अखंडित चालू आहे. त्यांनी गद्यलेखनही विपुल केले आहे. त्यात कादंबरी, कथा, ललित गद्य, व्यक्तिचित्रणे, शेती, जलसंवर्धन, पाणी, फलोत्पादन इत्यादी विषयांवर पुस्तिका आहेत. तसेच, संपादन केलेले ग्रंथही आहेत.

काव्यसंग्रहांना दिलेल्या अर्पणपत्रिका या शेतीशी निगडित नसलेल्या व्यक्तींना

अर्पण केल्या आहेत. मात्र 'पानझड' या काव्यसंग्रहाला लिहिलेली अर्पणपत्रिका अतिशय बोलकी आहे. ती अशी–

'प्रिय सौ. सुलोचना,

निसर्गात जरी झाडाच्या आधारानं
वेल वाढत असली
तरी आपल्या चाळीस वर्षांच्या आयुष्यात
वेलीच्या आधारानं
झाड जगण्या–वाढण्याचं अघटित घडलं
ते तुझ्यामुळेच
– म्हणून हा संग्रह तुझ्यासाठीच.

– नामदेव.'

'रानातल्या कविता' (१९६७) ते 'गंगा वाहू दे निर्मळ' (२००७) या चाळीस वर्षांच्या कालखंडात ना.धों. महानोर यांचे बारा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. 'पळसखेडची गाणी' ही पळसखेड आणि परिसरातील आयाबहिणींनी जात्यावर, झोपाळ्यावर, पाणवठ्यावर, झिम्माफुगडीमधून, गौराईच्या सणासुदीला, वही म्हणणाऱ्या फडातून आणि भारूडरचनेतून गायिलेली पारंपरिक लोकगीते आहेत. ह्या अनमोल ठेव्याला खानदेशी, अहिराणी, वऱ्हाडी बोलीभाषेचा गोडवा लाभला आहे. ना.धों. महानोरांनी आपल्या परिसरातील जाणकारांच्या तोंडून निघालेल्या शब्दांना अक्षररूप दिले, ते केवळ अडाणी, अशिक्षित ग्रामीण जीवनातील हे अक्षरसाहित्य जिवंत राहावे म्हणून. येथे महानोरांची भूमिका संपादनाची आहे. ते करताना त्यांनी 'गाण्यातला भाव, वर्णन, कथा यांना बाधा न आणता कुठे अस्पष्ट वाटलं, अडलं, जुळलं नाही तेथे ह्या ग्रामीण भागातील आयाबहिणींना विचारून सांधून, दुरुस्त करून घेतले. शब्द, शब्दाघात, लय तशीच ठेवली आहे.' 'पळसखेडची गाणी' ही महानोरांची स्वतंत्र रचना नसल्यामुळे 'महानोरांच्या एकूण कविता' संदर्भात या काव्यसंग्रहाचा संख्यात्मक (आकडेवारीत) हिशेब या संशोधनअभ्यासात धरलेला नाही. मात्र 'माझी लयविभोर गावरान कविता, शब्दकळा, लयीचा घाट ह्यावर लोकगीतांचा जबरदस्त प्रभाव आहे' अशी कबुली महानोर देतात. त्यासाठी 'पळसखेडची गाणी'च नाही तर महानोरांच्या एकूण गद्य लेखनाचा अभ्यासात विचार होऊ शकतो, तो गुणात्मक असेल. तसेच 'पक्ष्यांचे लक्ष थवे' आणि 'प्रार्थना दयाघना' या काव्यसंग्रहांतील अनुक्रमे २ व ५ एवढ्याच कवितांचा अभ्यासात समावेश आहे. या सर्वांचा हिशोब करता ना.धों. महानोर यांच्या एकूण ३८२ कविता आणि गीतांच्या आधाराने संशोधनअभ्यास केला जाणार आहे. 'गीत' हा काव्यप्रकार असल्यामुळे 'गीत' म्हणून त्याचा स्वतंत्र विचार

न करता कवितेचाच एक प्रकार म्हणून संशोधन अभ्यासात 'कविता' म्हणूनच विचार केलेला आहे.

ना.धों. महानोरवरील कवितेतून आत्मप्रकटीकरणाच्या रूपाने कसे व्यक्त होतात याचा कवितेच्या माध्यमातून अभ्यास केल्यानंतर त्यांच्या गद्यलेखनाचा संक्षिप्त मागोवा घेणे आवश्यक आहे. आपल्या जीवनाविषयी काही अभिप्राय त्यांनी वेळोवेळी नोंदवले आहेत. 'गांधारी' (कादंबरी), 'गपसप' (लोककथा) या ललितगद्य वाङ्मयप्रकारांत कल्पनारम्यता आहे. तेथे महानोर स्वविषयक व्यक्त होणे नाही. महानोरांनी आपल्या जीवनातील घटना, प्रसंगाची महत्त्वपूर्ण माहिती नोंदवली आहे ती 'ऐसी कळवळ्याची जाती' ह्या पुस्तकात. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यांनी त्यांच्या जीवनाला आकार देणाऱ्या बऱ्याच व्यक्तींची नामावली दिली आहे. 'माझ्या ह्या एकट्या जगण्यात मला साथ देणारी एकच मोठी पुंजी होती, ती म्हणजे साहित्य-कला-संस्कृती ह्या क्षेत्रांतल्या कितीतरी जिव्हाळ्याच्या मित्रांशी तीस-चाळीस वर्षांचे असलेले माझे गाढ ऋणानुबंध. त्यांच्या आठवणी. (प्रस्तावना पृष्ठ नऊ) ह्या आठवणी ज्यांच्या भोवती घुटमळतात अशी बरीच मंडळी आहेत. त्यात कलेश सोनावणे, राजा महाजन, प्रा. म.ना. अदवंत ही शिक्षक-प्राध्यापक मंडळी; पुरुषोत्तम पाटील, चंद्रकांत पाटील (मित्र), भालचंद्र नेमाडे, रामदास भटकळ, डॉ. राम आपटे, स्मिता पाटील, भंवरलाल जैन, सुहासिनी मुळगावकर यांच्यासारखी मित्रमंडळी, प्रा. वा.ल. कुलकर्णी, वि.द. घाटे, नरहर कुरुंदकर, तात्यासाहेब शिरवाडकर, पु.ल. देशपांडे, भाऊसाहेब खांडेकर, वसंत कानेटकर, ना.घ. देशपांडे, इंदिरा संत, रणजित देसाई, व्यंकटेश माडगूळकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, विजया राजाध्यक्ष, विंदा करंदीकर, नामदेव ढसाळ यांच्यासारखे साहित्यिक; नानासाहेब गोरे, एसेम, यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे राजकारणी पण साहित्याशी संबंध ठेवणारी जाणकार धुरंधर मंडळी; अमर शेख, लता मंगेशकर, हृदयनाथ मंगेशकर, जब्बार पटेल यांच्यासारखी संगीतकार, जाणकार मंडळी – यांचा समावेश आहे. या साऱ्यांच्या व्यक्तिचित्रणात ना.धों. महानोरांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविधरंगी पैलू गवसतात. महानोरांनी ह्या सर्वच व्यक्तिचित्रणांत 'स्व'विषयीचे अभिप्राय नोंदवले आहेत.

''ना. घ. देशपांडे ह्यांचे 'शीळ', 'अभिसार' कवितासंग्रह माझ्या हाती आले आणि माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्यातल्या सगळ्या कविता मी रानभर गात असे. ना. घं. नी मला पूर्ण वेडं केलं.'' (पृष्ठ ८८)

'ऐसी कळवळ्याची जाती' ह्या व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकातून महानोरांचे स्वविषयीचे अभिप्राय जाणून घेतल्यानंतर 'पळसखेडची गाणी', 'प्रार्थना दयाघना' आणि 'तिची कहाणी' या स्वतःच्या काव्यसंग्रहांना लिहिलेल्या प्रस्तावना अभ्यासणे

तितकेच महत्त्वाचे आहे.

'लहानपणापासून दारिद्र्यात आईच्या मांडीवर ओवी ऐकली. ती तशीच मनात आजही रुतून बसली आहे. आईच्या ओवीतला तो गलबला अजून मर्तकीच्या (मृत्यूची) ओवी म्हणताना डोळ्यांत पाणी आणतो.... माझ्या उद्ध्वस्त बकाल इवल्याशा गरीब खेड्याला ही गाण्याची – लोकसाहित्याच्या धनाची पुण्याई पूर्वापार लागली आहे.'

.....'गांधारी', 'गावातल्या गोष्टी'मधून तर स्त्रियांची अगतिकता व सामाजिक वास्तव मांडून हे दुःख मी सांगितलं आहे. थोडंफार पुन्हा ह्या कवितांमधून सांगितलं. ... व्यक्तिगत व सामूहिक जीवनातली माझी ही कविता हे दुःख ओटीपोटी घेऊन झालेली आहे'... 'रसिकांनी माझ्यावर, माझ्या कवितेवर खूप खूप प्रेम केलं, मला मोठं केलं. त्यामुळेच तर कविता ही माझी एकमेव मोठी शक्ती आहे. माझं गणगोत झालेल्या रसिकांचा स्नेहभाव व ऋण माझ्यासाठी शब्दांपलीकडले.'

....'कविता अशी बिलगून राहिली म्हणजे प्रचंड ओरबाडून टाकणारे दुःखताप हलके होत जातात. पुन्हा नव्यानं उभं राहण्याची, जगण्याची उमेद येत राहते. कवितेच्या या अद्‌भुत शक्तीनं प्रत्येक वेळी मला नवं, समृद्ध आयुष्य दिलं. विशेषत प्रत्येक मोठ्या दुःखाच्या तोंडी ती उभी राहिली. मला सांभाळलं. दूर एकाकी लहान खेड्यातल्या मला जगभरचं सगळं दिलं.'

ना.धों. महानोर एक सामान्य शेतकरी कुटुंबातील शेतकरी, शेती–शिवाराचा प्रेमी, सामाजिक जाणिवांचा साधा कार्यकर्ता, तर राजकीय वलय थोड्या काळाकरिता लाभलेला राजकारणी या विविध भूमिका पार पाडताना आपल्यामधील कवी सदैव जागृत ठेवणारा साहित्यिक म्हणून 'कविता'मधून, 'ऐसी कळवळ्याची जाती' ह्या व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकातून आणि स्वतःच्या काव्यसंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेमधून व्यक्त झालेले आहेत. स्वतविषयीचे विविध पैलूंचे दर्शन देत ते अभिव्यक्त झाले आहेत, ते त्यांच्या अभिप्रायांमधून. या अभिप्रायांमधून महानोरांचे रानाविषयीचे प्रेम, निसर्गाकडे असलेला ओढा; वाचनाची प्रचंड आवड, कवितेची जाण व प्रेम; शेताच्या हिरव्या बोलीचा शब्द झाल्याची भावना; समाजाप्रती प्रेम स्पष्ट करणारी समाजवादी निष्ठा; लोकसंगीत, लोकवाङ्‌मयविषयीचा दृष्टिकोन; ऐश्वर्याचा राजा म्हणवून घेताना दिसलेला आत्मप्रौढीचा भाव, पारदर्शकपणा, प्रत्येक कामातील आत्मनिष्ठा, बिनधास्तपणा, तसाच आत्मविश्वास – साहित्य, साहित्यिक, संगीतकार यांविषयीचा प्रचंड कळवळा, आईविषयीची माया – हळवेपणा, सामाजिक जाणिवांतून जाणवलेली संवेदनशीलता, अजातशत्रू, प्रसिद्धीचा हव्यास, गतिमानता आदी बाबी कवीच्या व्यक्तिमत्त्वाचे अत्यंत महत्त्वाचे पैलू म्हणून आपल्याला जाणवतात.

ना.धों. महानोर यांच्या कवितेचा आशयानुसार आणि त्यांनी हाताळलेल्या रचनाप्रकारांनुसार

१. कवितांचा प्रवास प्रणय, शृंगारजाणिवांच्या मुक्त आविष्काराकडून प्रणयजाणिवांचा कमी कमी होत जाणारा प्रकार अधोरेखित करतो.

२. त्यांच्या कवितेची प्रकृती स्फुट कवितेकडून दीर्घकविता, खंडकाव्यापर्यंत झुकलेली जाणवते.

३. कवितेचा ओढा निसर्गप्रेमाकडून समाजाभिमुखतेकडे वळला आहे.

४. कवितेचे रूप गेयप्रधान कवितेकडून गद्यप्रधान कवितेकडे वळून पुन्हा रचनाप्रधानतेकडे झुकलेले स्पष्ट होते.

५. आशयानुरूप कविता रचनाबद्धतेकडून मुक्त रचनाप्रधानतेकडे वळसे घेते.

ना.धों. महानोर यांच्या कवितेचा प्रवास त्यांच्या वयानुसार, काव्यानुभवाच्या प्रगल्भतेनुसार, त्यांच्या चिंतन-मननातून सुरुवातीचा शारीरिक स्तर, नंतर सौंदर्यवादी स्तराकडून मानसिक स्तर, भावनिक स्तर आणि वैचारिक स्तर असे आविष्काराचे, अभिव्यक्तीचे टप्पे अधोरेखित करतो. ना.धों. महानोर यांच्या विविध टप्प्यांवरील कवितेचा प्रवास जाणून घेतल्यानंतर त्यांच्या कवितेचे १. प्रेमकविता, २. निसर्गकविता, ३. सामाजिक आशयाच्या कविता, ४. आध्यात्मिक जाणिवांच्या कविता, ५. ग्रामीण कविता, ६. अवांतर-दीर्घकविता, खंडकाव्य, व्यक्तिदर्शन कविता इत्यादी असे प्रकार पाडता येतात.

ना.धों. महानोर यांनी आजपावेतो प्रेमकविता, निसर्गकविता, सामाजिक आशयाची कविता, आध्यात्मिक जाणिवांची कविता, ग्रामीण ढंगाची कविता, खंडकाव्य आणि व्यक्तिदर्शन घडवणारी दीर्घ कविता आदी कवितेचे प्रकार हाताळले. तरीसुद्धा 'रानातल्या कविता'मधून त्यांची जी ओळख निसर्गकवी, प्रेमकवी म्हणून झाली ती कायम राहिली. छंदबद्ध रचनेतील कविता आणि चित्रपटांना लिहिलेली गीते ना.धों. महानोर यांना रसिकांच्या हृदयस्थानी विराजमान करायला साहाय्यभूत ठरली. खंडकाव्य, दीर्घकाव्य यातून ना.धों. महानोर यांनी रचनेचे विविध प्रयोग केले. ते सर्वच रसिकमान्य झाले नाहीत. त्याला कारण रसिकांनी ना.धों. महानोर यांच्या बाबतीत एक चौकट आखली आहे आणि त्या चौकटीबाहेर ते ना.धों. महानोर यांना जाऊ देत नसावेत. कलावंतांना कुठलीच बेडी घालून अडकवणे कलेच्या दृष्टीने योग्य नाही. कलावंत हा मनाने, विचाराने अभिव्यक्त होण्यास मोकळाच राहिला पाहिजे. आधुनिक कवितेच्या कालखंडात काव्याच्या अंतरंगामधील परिवर्तनाबरोबर बाह्य स्वरूपात अनेक परिवर्तन झाले. केशवसुत कालखंडापासूनचे हे परिवर्तन ना.धों. महानोर यांनी डोळसपणे अभ्यासले. त्यांनी काव्यातील 'गेयता' आणि 'काव्यार्थ'

याकडे दुर्लक्ष होणार नाही अशी काळजी घेतली आणि कवितेतली निर्यमकी रचना यशस्वी करून दाखवली. लोकगीताच्या माध्यमातून ना.धों. महानोर यांनी स्त्रीगीते, शेतीगीते आणि जानपदगीते इत्यादी काव्यप्रकारांना हाताळले असले तरी शिशुगीते, सुनीत, गझल यांना स्पर्श केला नाही. तसेच, त्यांच्या काव्यात विडंबनकाव्याचा प्रयोगही जाणवला गेला नाही. तो त्यांचा पिंड नाही. काव्यसौंदर्याचा उपासक व्हावे पण विडंबनकार होऊ नये अशीच त्यांची मनोभूमिका असावी, असे वाटते.

ना.धों. महानोर यांनी चित्रपटांसाठी आणि नाटकांसाठीही गीते लिहिली. 'ह्या गीतरचनेत कविता महत्त्वाची ह्याची मी काळजी घेतली' गीते या मुळात कविताच असतात.' 'ना.धों. महानोर यांनी कविता व गीत असे सुस्पष्ट विभाजन केलेले नाही. चांगली कविता व चांगले गीत ही दोन्ही परस्परसंलग्न असतात पण हे फक्त तात्त्विक पातळीवर ठाऊक असून उपयोग नसतो. ते प्रत्यक्ष निर्मितीच्या पातळीवरही कवीला जाणवले पाहिजे. ही जाणीव कवितेतील गीतगुणाचा व गीतातील काव्यस्पर्शाचा मूलस्रोत असतो. परस्परसंवादी राहूनही ही दोन रूपे आपले स्वायत्तपण अबाधित ठेवतात व परस्परांचे सौंदर्य व सामर्थ्यही वाढवतात. मुक्त व छंदोबद्ध अशा दोन्ही स्वरूपांच्या वाटा कवीला मोकळ्या राहतात त्याही यामुळेच' असे डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी म्हटले आहे, ते यथार्थच आहे.

ना.धों. महानोर यांच्या कवितेतील आशय हा प्रत्यक्ष त्यांच्या जगण्याशी निगडित आहे. तो रोजच्या जीवनातील आहे. त्यातील काही कल्पनेतील नाही. ते प्रत्यक्ष त्यांनी अनुभवलेले आहे. कलावंत, माणूस आणि शेतकरी अशा विविध नात्यांनी ना.धों. महानोर रान, शेत, शिवार, स्त्री, समाज यांच्याशी जवळीक साधतात. त्यांच्या अभिव्यक्तीसाठी कवितेच्या विविध रचनापद्धती यांचा सुरेख वापर करतात.

**– डॉ. मधुकर केशव वर्तक**
भ्रमणध्वनी – ९७०२७५२५२१

सूचना :
'साहित्य' अंकाची वर्गणी थेट बँक खात्यातही जमा करता येईल.
त्यासाठी साहित्य संघाचा बँक अकाउंट नंबर
तसेच IFSC Code कव्हर २ वर दिलेला आहे.
ऑनलाइन वर्गणी भरल्यास, तुमचा पोस्टल ॲड्रेस, पिनकोडसहित
७३०४३६९३९६ या मोबाइल नंबरवर पाठवावा.



**मराठीतले ज्येष्ठ समीक्षक प्रा. गंगाधर पाटील**

(फोटो सौजन्य – अशोक पाटील, विलेपार्ले)

# पाटीलसर आठवताना...

## अशोक बेंडखळे

मराठीतले ज्येष्ठ समीक्षक प्रा. गंगाधर पाटील यांचे नुकतेच (९ जुलै) निधन झाले. त्यांनी पाश्चात्य साहित्यविचार व समीक्षा मराठीत आणली. त्याचबरोबर नामवंत समीक्षक म.सु. पाटील यांच्या साथीने आदिबंधात्मक समीक्षा विचार मराठीत रुजवला. ज्ञानार्जन, ज्ञानसाधना आणि ज्ञानार्पण हा आपल्या आयुष्याचा जीवनमार्ग निश्चित केला. पाटीलसरांनी आपल्याकडील ज्ञान हजारो विद्यार्थ्यांना आयुष्याच्या नव्वदीपर्यंत दिले. हे भाग्य मला लाभले नाही, कारण मी होतो शास्त्रशाखेचा विद्यार्थी. मात्र त्यांचा सहवास लाभला, अनेकदा समारंभात ऐकता आले, आणि एका विद्वान समीक्षकाची ओळख झाली. त्याच्यातल्या मृदु स्वभावाच्या माणसाने मा मोहित केले.

कधी आयुष्यात योगायोगाने एखाद्या मोठ्या माणसाची ओळख होते. पाटीलसरांच्या बाबतीत तसेच पडले. माझा रिझर्व बँकेतला मोठा भाऊ याचा तिथंच काम करणारा अशोक पाटील हा मित्र होता. त्याच्याशी झालेल्या मैत्रीनंतर मी त्याच्या पारल्यातील घरी जात असे. त्यावेळी म्हणजे साधारण पन्नास वर्षांपूर्वी मी किरकोळ लिहू लागलो होतो. अशोकला ते माहीत झाले असावे. एकदा त्याच्या घरी गेलो असता तो म्हणाला, 'अरे तुझी गंगाधरकाकांशी ओळख आहे का? तू लिहितोस काही. भेटू या त्यांना.' आणि मग अशोकच्याच सोसायटीत राहणाऱ्या पाटीलसरांना भेटलो. सर साध्या कपड्यात होते. माझे आस्थेने स्वागत केले आणि चौकशीही केली. पुढे अशोकच्या सर्वोदय सोसायटीत गेल्यावर पाटीलसरांची भेट घ्यायची हा प्रघात पडला. त्यांच्या चांगुलपणाचा प्रत्यय एका प्रसंगातून मिळाला. १९८८च्या सुमारास एका प्रकाशक मित्राच्या आग्रहावरून मी रशियाचे त्यावेळचे अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांचे चरित्र लिहून पूर्ण केले. अशोकच्या सांगण्यावरून ती संहिता सरांकडे सुपूर्द केली. त्यांनीही वेळ काढून ती सगळी वाचली. आणि काही चांगल्या सूचना केल्या. मराठीतील गोर्बाचेव्हचे पहिले चरित्र म्हणून माझे कौतुक केले. पुस्तकाच्या मनोगतात मी पाटीलसरांचे आभार मानले. या छोट्या प्रसंगातून त्यांच्या समंजस व आस्थेवाईक स्वभावाचे दर्शन घडले.

त्यानंतर पारल्यातील प्रकाशन समारंभात तसेच साहित्यिक गप्पांमध्ये आम्ही भेटत होतो. या सर्वांमधून त्यांच्या निगर्वी स्वभावाचे, समोरच्या विषयीचे प्रेम, आस्था या सगळ्याचे दर्शन घडत होते. एकदा तर मॅजेस्टिक गप्पांमध्ये सतरंजीवर खाली बसून आम्ही चर्चा ऐकलेली आहे. एक गोष्ट आठवते, चाळीस वर्षांपूर्वी मी एक दिवाळी वार्षिक सुरू केले होते. अशावेळी लेखकमंडळी आपला लेख घ्यावा म्हणून मागे लागतात. पाटीलसरांना ही बाब माझ्या मित्राकडून नक्की कळली असणार. पण त्यांनी कधीही माझा लेख घेता का? म्हणून विचारले नाही. मात्र एका अतिउत्साही मित्राने त्याच्या प्रसिद्ध समीक्षकाकडून माझ्या वार्षिकासाठी लेख मागवून घेतला. लेख होता ४० पानांचा, व्याकरण या विषयावर. माझ्या १२० पानी अंकात मला तो कठीण विषयावरचा लेख टाकणे शक्य नव्हते. लेख परत पाठवल्यावर त्या प्राध्यापकांनी अकांडतांडव केले. त्या पार्श्वभूमीवर पाटीलसरांचा संयमपणा आज कौतुकाचा वाटतो.

आणखी एक प्रसंग सरांच्या स्वभावावर प्रकाश टाकणारा. नामवंत विदुषी डॉ. सरोजिनी वैद्य यांच्या निधनानंतर साहित्य संघाने श्रद्धांजली सभा आयोजित केली होती. पाटीलसर आले होते. परत येताना त्यांच्या टॅक्सीत मला घेतले. सभेत वाईच्या एका सहकाऱ्यांनी बोलताना एक चुकीचे विधान केले होते. सरांना ते लागले. मात्र त्यांनी सौम्य शब्दात त्याबद्दल नाराजी व्यक्त केली. त्याचवेळी त्यांनी सरोजिनीबाई मराठी विभागप्रमुख असूनही त्याच्या दालनात येऊन सर्व प्रकारचे साहाय्य देण्याबाबत शाश्वत कार्य केले होते आणि पुढेही सौजन्यशील वागणूक दिली होती हे सांगितले. मी साहित्य संघात काम करतो, हे त्यांना कळले होते आणि त्यांनी जुने कार्यकर्ते वा. रा. ढवळे यांची आठवण सांगितली. पाटीलसर संघाच्या अमराठी भाषकांच्या वर्गात शिकवायला यायचे. त्यामुळे ढवळे यांची मैत्री झाली होती. ढवळे यांनी आग्रह करून त्यांना साहित्य संघाचे सभासद करून घेतले आणि त्यांचे सभासद शुल्क स्वत: भरले. वारांच्या या औदार्याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

विजय तेंडुलकर, शंकर वैद्य आणि गंगाधर पाटील या तिघा नामवंतांचा मला सहवास लाभला. एक विख्यात नाटककार, तर दोघे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक. तिघांचेही वाचन प्रचंड, अभ्यास प्रचंड. तिघांनीही प्रसिद्धीचा कधी हव्यास केला नाही. मान-मरातबांच्या मागे लागले नाही. खरं म्हणजे तिघेही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होण्याच्या योग्यतेचे. तो मान लाभला नाही म्हणून कधी खंत केली नाही. असे विचारवंत साहित्यिक प्रभावाने असतात. आयुष्यात तिघे मला भेटले हे माझे परमभाग्य. कविवर्य पाडगावकरांची एक गोष्ट आठवते. लहानपणी त्यांना एक गुरुजी कविता शिकवायचे. शिकवताना मुलांचे कान पिळायचे, पाठी धपाटा मारायचे. मुलांना त्यांच्याकडून कविता शिकणे नको असे वाटायचे. कानपिळे गुरुजी बदलून दुसरे गुरुजी

आले. ते म्हणाले, ‘बालकवींची ‘आनंदी आनंद गडे’ कविता शिकवतो.’ मुलांनी धसका घेतला होता म्हणून म्हणाले, ‘नको’. गुरुजी म्हणाले, मला ही कविता आवडते ‘आणि त्यांनी कविता हावभावासहित म्हटली, सुंदर अर्थ सांगितला. म्हणाले, कविता आवडली का, आनंद झाला का?’ त्यावेळी पाडगावकरांना कळले कविता आवडण्यासाठी, आनंदासाठी असते ते आणि त्यांना कवितेची गोडी लागली. त्यातून एक मोठा कवी मराठीला मिळाला. शिक्षक काय करू शकतो त्याचे हे उदाहरण. पाटीलसरांनी सुद्धा असेच अनेक विद्यार्थी घडवले. अरुण खोपकर म्हणतात त्याप्रमाणे ते त्यांना पाठ्यपुस्तक शिकवत नसत तर भाषा शिकवत. आणि खोपकर साहित्य अकादमी पुरस्कारापर्यंत पोचले.

मला पाटीलसरांकडून शिकण्याचं भाग्य लाभलं नाही, मात्र चांगला माणूस कसं बनावं ते नकळत त्यांच्याकडून शिकलो. ते ऋण कायम राहणार आहे!

**– अशोक बेंडखळे**
भ्रमणध्वनी : ९८६९२५८५८५

## ‘साहित्य’ त्रैमासिकासाठी साहित्य पाठवण्याबाबत सूचना

- ‘साहित्य’करता लेखन पाठवताना, ते टंकलिखित अथवा संगणकाद्वारे मुद्रित केलेले असावे. लिखित स्वरूपात असल्यास, सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेले असावे.
- लेखन narayanlale@gmail.com अथवा sahityasangha@gmail.com यावर किंवा संपादकीय पत्त्यावर पाठवावे.
- सृजनात्मक, संशोधनात्मक लेखनाचे तसेच दर्जेदार, वैचारिक, ललित लेखनाचे स्वागत आहे.

## वाचक, वर्गणीदार यांना नम्र विनंती

‘साहित्य’ त्रैमासिक दर्जेदार लेखनाला प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न करत आले आहे. यातील सातत्य टिकवण्यासाठी लेखनाची जशी गरज असते तशी वाचकाचीही गरज असते– विचार व साहित्यकला यांच्या सृजन–संवर्धनासाठी आपल्यासारख्या वाचकांची, वर्गणीदारांची ‘साहित्य’ला गरज आहे – वर्गणी कुठल्याही अंकापासून भरता येते.



रानसुगंध पसरवणारी कुंजणची फुलं

# कुंजण

## पौर्णिमा केरकर

कुंजणची फुले सर्वांच्याच ओळखीची असतील असे सांगता येणार नाही. पण ज्यांनी कोणी ती अनुभवली असतील ते तर तिच्या अस्तित्वानेच मोहरून उठतील. एवढे मात्र नक्कीच. सहजपणे दिसणारी नाहीत ही फुले कोणाच्या तरी बागेची शोभा होताना, किंवा दिसणारही नाहीत नखरेल होत येणाऱ्या जाणाऱ्यांना खुणावताना...! ती असतात आपल्याच तंद्रीत. धुंदीत. मंद मधुर सुगंधाची सोबत घेऊन वाऱ्याने डोलणारे वन होऊन! रानगंधाचे वैभव मिरवत. ज्यांना रानवेडाने भारलेले असेल त्यांना तर ती खुणावतातच.. शिवाय ज्यांना फुलांची मनस्वी आवड आहे ती तर अगदी या फुलांना अनुभवण्यासाठी कोठेही जाण्याचे दिव्य करतील हे नक्कीच! फक्त अंगणाची शोभा वाढावी म्हणून नाही तर स्वतःच्या धुंदीत मस्त आनंदात स्वैर भटकत रानोमाळ पसरणारा हा सुगंध हवाहवासा वाटणारा जीव गुंतवून ठेवणारा.

कुंजणफुलांची आणि माझी ओळख ही अगदी अलीकडची. लग्नानंतर. दोन दशकांपूर्वी चोरला घाटमार्गाने बेळगावला जाताना तिचे ओझरते दर्शन झाले होते. तेही लांबूनच. त्या तिथे गच्च भरलेले, पांढऱ्या फुलांनी डवरलेले झाड आहे ना ते कुंजणीचे झाड. सुवास बघ कसा येतो, एवढ्या दूर हे एवढेच निमित्त तिच्याकडे जाण्यासाठी उपयुक्त ठरले. कुंजण त्यावेळेपासून आजतागायत मनातळातून आवडायला लागली. माझ्या अंत:करणातील खास जागा तिने व्यापलेली आहे. तिचा रानभरी सुगंध मनभर व्यापलेला असताना ती लांब असूनही अगदी जवळच असल्याचा सतत भास होतो. परसबागेत जाई होती तशीच जुईही होती. दोहींच्या सुगंधाची तुलनाच करता येणार नाही. पिराच्या थडग्यावर भरभरून फुलणारी कुंदा तर मनस्वी आवडायची. रंग पांढराच, पण त्यातही विविध छटा. जाई पांढुरकी गुलाबी छटा ल्यालेली. जुई त्याहीपेक्षा नाजूक, पानांचा हलका हिरवा झाक तिच्यावर चढल्यासारखा. कुंदा लांब कळ्यांची पांढरीशुभ्र. या सर्व फुलांत कुंजण मात्र मला रातराणीची आठवण करून देते. कुंजण जुईसारखी दिसते खरी, परंतु तिचा गंध रातराणीशीच नाते सांगतो. ती रानाची राणी.. सदाहरित जंगलातील तिचे अस्तित्व

हे एखाद्या सडपातळ बांध्याच्या तरुणी सारखेच. मे महिन्याच्या मध्यावर कुंजण फुलण्यासाठी तयारी करू लागते. नुकतीच कोठेतरी तिच्यावर नवी तकाकी येते. सर्वच पाने झडझडून जागी होतात. बारीक बारीक कळ्यांचे गुच्छ पानांच्या माधोमध, फांदीच्या वरच्या टोकाला रातराणीसारखेच पुंजके-पुंजके तयार होतात. आणि एकदा का ते नाजूक कळे उमलायला सुरुवात झाली की मग तिचा परिमळ आसमंती दरवळतो. फुले तर इतकी झाडाशी एकरूप होतात की संपूर्ण झाडच पांढऱ्याशुभ्र फुलांनी भरलेले दिसते. नभांगणातील हजारोच्या संख्येने चांदणी जणू काही या झाडावर विसावा घेण्यासाठी आलेली आहे असाच भास व्हावा एवढी ती छोटुकली चमकदार फुले जिवाला पुरते वेड लावतात. भरपावसात तर त्यांचे ते निथळत राहणे हे अनुभवणे तर मोठे काव्याच असते.

त्या दिवशी ही असेच चोरला घाटातून बेळगावीमार्गे साताऱ्याला कासच्या पठारावरील पुष्पवैभव डोळ्यांत साठवून ठेवण्यासाठी प्रवास करत असता चोरला गावाची हद्द ओलांडली आणि तेवढ्यातच मादक तरीही मंद अशा गंधाने तनामनाला बेहोष केले. ही बघ कुंजण फुललीती बघ कुंजण फुलली. एकदा डाव्या, तर एकदा उजव्या बाजूला बघितले असता रस्त्याच्या कडेला, तर पुढे गेल्यावर जराशी आत कुंजण नुसती बहरून ओसंडत होती. दूर टेकडीच्या पायथ्याशी, क्षितिजावर नजर फिरवली असता कुंजणीची कितीतरी झाडे फुलांनी भरून गेलेली दिसली. हिरवा गालिचा अंथरलेला. त्यावर दाटीवाटीने उभी असलेली सदाहरित जंगली झाडे.

आणि त्या तशा धष्टपुष्ट झाडांच्या मांदियाळीत कुंजणीचे डेरेदार सुबक झाड. पानांची सळसळ घेऊन फुलांना नवचैतन्य बहाल करत होते. सगळा परिसरच हिरवाईच्या विविध छटांना घेऊन उभा होता. त्यात कुंजणीची ठिकठिकाणी विखुरलेली झाडे मात्र पांढऱ्या रंगाची गंधाळलेली फुले कुरवाळत उभी होती. त्या हिरवळीच्या क्षितिजापर्यंतच्या गालिच्यावर गडद, पोपटी, फिकट हिरवा, काळपट हिरवा अशा रंगंत कुंजणीचा पांढराशुभ्र रंग सात्त्विक सोज्वळतेची रानभूल मनावर अधिराज्य गाजवत होती. कुंजणफुलांचे अलौकिक सौंदर्य पाहून वाटले, ही फुले रानापुरतीच कशी बरे मर्यादित राहिली? रातराणी अंगणाची शोभा वाढवणारी म्हणून भाव खात आहे. कुंजणीचे झाड रातराणीपेक्षा मोठे सुबक आकाराचे. सळसळते चैतन्य जणू काही तिच्या पानापानात उतरलेले. रातराणी शहरी ललना. नाजूक आखीवरेखीव. नीटस असलेली. कधी अंगणाच्या मधोमध, कडेकुशीला तर कधी कुंडीत तिचे वास्तव्य. तिची देखभालही तशीच काळजीपूर्वक केलेली. रात्रीची फुलणारी. मादक गंधाची. जुई मंदगंधी तिन्हीसांजा पुलकित करणारी. या दोघींनी आपापले कार्यक्षेत्र ठरवून टाकलेले. कुंजणीचे मात्र तसे नाही. सह्याद्रीच्या डोंगररांगांत ती कोठेही रुजते, वाढते. मध्यम आकाराचे हे झाड बहरात मात्र पांढरे होते.

मध्यंतरी हिमाचल प्रदेशातील पर्वतराजीत वसलेल्या भिवखुरी या छोट्या खेड्यात जाण्याचा योग आला. डोंगर कपारीत विसावलेली ती छोटी छोटी घरे, दर दिवशीचे आयुष्यातील चढउतार तर होतेच, शिवाय डोंगरावरील चढउतार करावेच लागतात. तिथेच रामगढी हा जुना किल्ला बघण्यासाठी जात असता कुंजणी सारखीच असंख्य झाडे पांढऱ्या शुभ्र फुलांनी भरून ओसंडत होती. ती ही रानफुलेच होती, त्यांच्या भाषेत तर या झाडांना तील के पेंडअसेच म्हटले जाते. रामगढीला पोहोचेपर्यंतचा दुतर्फा रस्ता तील  फुलांच्या बहरानेच भरला होता. खूप सुंदर अशी मोठ्या झाडावरील ती छोटी फुले, संपूर्ण प्रदेशाला शोभा आणत होती, असे असतानाही त्या फुलांकडे म्हणावे तसे कोणाचे लक्ष जात नाही. कुंजणीचेही असेच आहे. ती रानात फुलते. ग्रामीण युवतीसारखी अल्लड, तेवढेच कणखर सौंदर्य ल्यालेली. तिला कुठलाच गिलावा नको. ती जशी आहे अगदी तशीच सहजतेनेच वाढायला हवी. ही फुले माळण्याचा योग कधी आला नाही. किंबहुना ती हौस भागावायलाच हवी. पावसाळ्यात अगदी आता याच दिवसांत घाटात गेले असता कुंजणीच्या लावण्याचा अनुभव घेता येतो. 'तील'ची झाडे अनुभवली खरी पण कुंजणीसारखा बेहोशी आणणारा सुवास तिला नव्हता. इतर झाडांत ती उठून दिसायची. ते उन्हाळ्याचे दिवस होते, बरीच मोठंमोठी झाडे होती, काही पानगळतीचे वृक्ष दिमाखात उभे होते, तर काही जागा अगदीच उदास. मोकळ्या. त्यामुळे 'तील' वृक्षांचा बहर त्या वेड्यावाकड्या वळणवाटांवरून कुठूनही बघितला तरी दिसायचा. कुंजणीचे मात्र तसे नाही. ती तिच्या सुगंधित आणि चमकदार सौंदर्याची छाप जणू सर्व रानभर पाडून आहे. सर्व धष्टपुष्ट वृक्षराजीत सह्याद्रीला मोहवीत आपल्याच मस्तीत धुंद होऊन सळसळत आहे.

**– पौर्णिमा केरकर**
भ्रमणध्वनी : ८८०५१४४५६५

## श्रद्धांजली

ज्येष्ठ समीक्षक गंगाधर पाटील
मौज प्रकाशनचे माधवराव भागवत
प्रसिद्ध गायक भूपेंद्र सिंह
रजनीताई दांडेकर (क्रायलिनच्या सुभाष दांडेकरांच्या पत्नी)
ज्येष्ठ कादंबरीकार नंदा खरे
कवी रमेश आंजर्लेकर

# अनोखी परंपरा

## प्रा. डॉ. नरेंद्र पाठक

आपल्या परिचयाच्या व्यक्तींची सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक किंवा राजकीय क्षेत्रात उच्चपदावर नियुक्ती झाली किंवा निवड झाली तर आपल्याला आनंद होतो. ती व्यक्ती मित्र नातेवाईक यांच्यापैकी किंवा त्यांच्या कुटुंबातील असेल तर जास्त आनंद होतो. ती व्यक्ती आपल्या कुटुंबातील, परिवारातील असेल तर आपला आनंद शतगुणित होतो. उच्चपदी निवड झालेल्या व्यक्तीशी आपली कुठेतरी पारिवारिक नाळ आहे याचं निखळ समाधान जाणवतं. महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या अध्यक्षपदी श्री राहुल नार्वेकर यांची अलीकडेच निवड झाली. मुंबई साहित्य संघाच्या कार्यसमितीच्या व्हॉट्सअॅप समूहावर पारिवारिक आनंद व्यक्त होऊ लागला, कारण महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षपदी निवड झालेले राहुल नार्वेकर हे आपल्या कार्यसमिती सदस्या रेखा नार्वेकर यांचे पुतणे. त्यामुळे साहित्य संघाच्या परिवारातील सगळ्यांनाच आनंद वाटावा, अभिमान वाटावा अशी ही घटना. त्यानिमित्ताने विधानसभा, विधानपरिषद पूर्वाध्यक्षांच्या नावांची उजळणी झाली आणि असं लक्षात आलं की राहुल नार्वेकर यांच्या आधी महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सभापती जयंतराव टिळक (डॉक्टर उज्ज्वला मेहेंदळे यांचे मामा) आणि वि. स. पागे (प्रकाश पागे यांचे वडील) हेसुद्धा महाराष्ट्र विधानपरिषदेचे अध्यक्ष राहिले होते. मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्यसमितीच्या आणि पदाधिकाऱ्यांचा ऊर अभिमानानं भरून येणं स्वाभाविक आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे विधानसभा व विधानपरिषदेचं उच्चपद भूषवणाऱ्या या तिन्ही व्यक्ती केवळ मुंबई साहित्य संघाच्या कार्यकर्त्यांच्या जवळच्या नात्यातील आहे, इतका मर्यादित आनंद नाही, तर त्या तिन्ही व्यक्तींचे सामाजिक, राजकीय आणि साहित्यिक कर्तृत्व शब्दातीत आहे. त्यामुळे जयवंतराव टिळक, वि.स. पागे आणि राहुल रार्वेकर यांच्या कार्यकर्तृत्वाविषयी मुंबई मराठी साहित्य संघास अभिमान व कृतज्ञता आहे.

### १) वि. स. पागे (१९१० ते १९९०)

केवळ महाराष्ट्राच नव्हे तर संपूर्ण देश वि.स. पागे यांना रोजगार हमी योजनेचे

जनक म्हणून ओळखतो. महाराष्ट्रात १९७२च्या भीषण दुष्काळाच्या काळात उद्भवलेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी पागे यांनी त्यांच्या संवेदनशील चिंतनातून रोजगार हमी योजना आकारास आणली. हीच योजना पुढे केंद्र सरकारनं संपूर्ण देशभर राबवली. विद्यार्थिदशेतच देशाच्या स्वातंत्र्यचळवळीत ते सक्रिय झाले. १९३० ची सविनय कायदेभंग चळवळ, १९४० चा वैयक्तिक सत्याग्रह, १९४२ चे भारत छोडो आंदोलन अशा विविध आंदोलनांत सहभागी झाल्यानं पागे यांना कारावासही भोगावा लागला होता. वि.स. पागे हे जसे राजकीय आणि सामाजिक नेतृत्व होते, त्याचप्रमाणे ते उत्तम साहित्यिकही होते. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय या नामांकित संस्थेच्या जडणघडणीत त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. त्यांनी विपुल लेखनही केले आहे. 'काम करण्याचा हक्क', 'कथा ही रोह्यांच्या जन्माची', 'नवे राष्ट्रदर्शन– रोजगार हमी योजना', 'बेकारीनिर्मूलनातून ग्रामविकास' या सामाजिक ग्रंथांबरोबरच, 'संत चोखामेळा', 'पहाटेची नौबत', 'अमर पक्षी', 'कविता ममनादनौबती' हे कवितासंग्रह, तसंच, 'निवडणुकीचा नारळ', 'विश्वदर्शन', 'तुका म्हणे जाऊ वैकुंठा चाल' ही नाटकं त्यांनी लिहिली होती. १९७८ साली विधानपरिषदेच्या सर्वोच्च अशा सभापती पदावरून निवृत्त झाल्यानंतरही पागे यांनी त्यांच्या निधनापर्यंत शासनाच्या विविध समित्यांवर नाममात्र एक रुपया वेतन घेऊन अनेक वर्षं काम केलं. त्यांच्या वागण्यातून त्यांनी देशापुढे एक मोठा आदर्श निर्माण केला.

### २) कै. जयंतराव टिळक (१९२१ ते २००१)

जयंतराव टिळक यांनी संयुक्त महाराष्ट्र आणि गोवा मुक्तिसंग्रामलढ्यात महत्त्वाचं योगदान दिलं होतं. त्यांचं वक्तृत्व म्हणजे मुलुख मैदानी तोफ. ते भाषण करायला उभे राहिले की ते प्रति लोकमान्य टिळक भासायचे. लोकमान्य टिळकांचा वारसा जपण्याचं अवघड कार्य जयंतराव टिळकांनी केलं. पुणे शहरातल्या अनेक संस्था त्यांनी वाढवल्या आणि मोठ्या केल्या. या अनेक संस्थांच्या माध्यमातून जयंतरावांनी एक प्रकारे पुणे शहर घडवण्याचंच काम केलं. पुणे शहर आणि महाराष्ट्राला एवढं मोठं सामाजिक नेतृत्व देऊनसुद्धा दुर्दैवानं त्यांना पुण्यातील टिळकवाडा सोडावा लागला. नंतर अकरा वर्षं अश्रितासारखं राहावं लागलं, तरी कुणाबद्दलही त्यांनी अपशब्द काढला नाही की कुणाबद्दल रागही व्यक्त केला नाही. सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून लिहिण्याचे संस्कार, भाषाशैली आणि भाषेतील प्रखरपणा त्यांनी कमी होऊ दिला नाही. पत्रकारांनी, संपादकांनी सामान्य माणसाला केंद्रबिंदू म्हणून कसं लिहावं याचा आदर्श म्हणजे जयंतराव टिळक. त्यांनी अनेक पत्रकारांना लिहितं केलं. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या केसरी वृत्तपत्राचे ते अनेक वर्षं संपादक होते. जयंतराव टिळक काँग्रेसचे नेते म्हणून जनसामान्यात परिचित असले, तरी ते मूळ हिंदू महासभेचे सक्रिय कार्यकर्ते होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांची अमोघ वाणी, त्यांचं लेखन, त्यांचा जाज्वल्य राष्ट्राभिमान यामुळे जयंतराव

अगदी तरुण वयातच हिंदू महासभेकडे आकर्षित झाले आणि सावरकरांचे अनुयायी बनले. मुळात जयंतराव टिळकांना भाषा, साहित्य आणि संस्कृतीची उत्तम जाण होती. त्यांनी लिहिलेलं 'वारसा' हे विविध विषयांवरील आत्मचरित्रात्मक लेखांचं पुस्तक आजही संग्राह्य म्हणून वाचकांना उपयोगी पडतं.

**३) राहुल नार्वेकर**


राजकारण आणि सामाजिक कामाचा वारसा लाभलेले राहुल नार्वेकर हे देशातील पहिले तरुण सभापती म्हणून त्यांची नियुक्ती स्मरणात राहील. कोकणातील सावंतवाडी हे त्यांचं मूळ गाव. कफ परेड येथील जी.डी. सोमाणी या इंग्रजी शाळेत शिक्षण घेतलं असलं तरी मराठीची त्यांना उत्तम जाण आहे. बालवयात दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेतला होता. लहानपणापासून एकूणच हरहुन्नरी आणि धडपडणारं असं व्यक्तिमत्त्व म्हणजे राहुल नार्वेकर. महाराष्ट्र विधानसभेच्या इतिहासात प्रथमच तरुण, तडफदार असे अध्यक्ष सभागृहाला लाभले आहेत. सभागृहाच्या कामकाजाचा आणि नियमांचा त्यांचा चांगला अभ्यास आहे. राजकीय पक्षांशी वैचारिक भेद असले तरी सर्वपक्षीय स्नेहसंबंध जपलेले आहेत. अनुभवाच्या आणि सर्वपक्षीय स्नेहबंधाच्या जोरावर राहुल नार्वेकर हेसुद्धा पूर्वसुरींचा आदर्श निर्माण करतील अशी अपेक्षा. त्यांच्या कार्यकालासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

**– प्रा. डॉ. नरेंद्र पाठक**

भ्रमणध्वनी : ९१६७४०६०५०

*Congratulations..*






Happy to share that **Dr. Ashwinitai Bhalerav-Gandhi** has been awarded the Fellowship of the International Society for the study of Vulvovaginal Disease at its World Congress at Dublin! Dr Nina Madnani and Dr.Ashwini are the first 2 Indians to receive this Fellowship so far!... Congratulations..

**डॉ. अश्विनी भालेराव–गांधी ह्या मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्यवाह आहेत.**

# । कविता ।



## गुलमोहर

गुलमोहर गळतो आणि
पक्षी उडतो फांदीवरुन
फुलांचे देह पसरतात जमिनीवर
सडा सडा सर्वत्र

मी सडा पाहतो मला आठवते रक्त
मी रक्ताची नाती पाहतो
नात्यातून विणतो गुंताळा
आणि लगडतो झाडांना

मी झाडांतून शोधतो मूळ
शोधतो कुळांचे अवशेष आणि
फांद्याफांद्यातून वाहणाऱ्या जीवनरसाचे
उगम–बिगम

मी पाहतो फळाच्या देठांतून सांडणारी
फुलांची असंख्य मरणं
आणि बियांतून टरारुन आलेल्या जगण्यांचे
दुर्दैवी शोक

**– दा.गो. काळे**
भ्रमणध्वनी : ९४२१४६७६४०

## निष्ठा

अंधाराच्या घराचे मी
दार ठोठावले....
एक दिवा ठेवला
नि झाली उजेडाची नांदी
झुलू लागली नभात
भोळ्या नक्षत्रांची फांदी

रात्रभर  दिव्यापाशी
मन तेवत ठेवले....
मग क्षितिज रेषेशी
गेला काळोखास तडा
आणि क्षणात फुटला
सोने वाहणारा घडा

लकाकल्या  दिशा
चालू लागली पाऊले...
उजाडले उजळले
आता बोलबाला किती
मंद हसे कोनाड्यात
मुक्या निष्ठेची पणती

**– राधा भावे**
भ्रमणध्वनी : ९९२३८११००६



## उशीर कशाला?...

बाई गं,
नाकात वेसण घालायला नाकारशील तर
नाथ फोडून वेसण घालतील तुला ते

त्यांच्या चालीनं चालावं बऱ्या बोलानं
नाहीतर मानगूट पकडून चालवतील तुला
त्यांना हव्या त्या रस्त्यावरून

ते ठरवतील तेव्हा जमवून घे बहरून यायला
फुलायचं असतं हे विसरून
नुसतीच सावली द्यायला शिकून घे

जराजर्जर होताना करबाडत जाशील तू... होशील भकास
तेव्हा कोवळ्या नवीन फांद्या...
अंगाखांद्यावरून झुगारून देतीलच तुला, हमखास


त्याआधी पहा एकदा प्रयत्न करून
हे प्राक्तनाचे ओझे झिडकारायला
उशीर कशाला?
आज... अगदी आत्ताच...

**प्रा. स्मिता पाटील**
भ्रमणध्वनी : ८००७८४८३८४

## मागे वळून

मागे वळून काय पाहायचे त्या तुटलेल्या भिंती आणि आंधळ्या विहिरी.
जिथे उद्‌ध्वस्त झाले संसार आणि
पडझड झालेले गाई गुरांचे आंधळे गोठे.
काय रसद मिळणार आहे कवितेसाठी?
तो तलाव. त्याचे निळे जहर पाणी
आणि नर्तकीसाठी उभा केलेला तो रंगमहाल
जिथे आत्महत्यांचा सोहळा होत राहिला वर्षोंवर्षे
राज घराणे विस्कटत गेले कोण्या शापापोटी
काय देऊ शकेल
आपल्या भरजरी पदराला?
चाफे नुसतेच विस्तारत राहिलेत निरुद्देश, मोकाट जंगल झालेत
पोसत राहिलेत सर्प, जहराचे छंद
पुरवता येतील म्हणून.
जहराच्या कुप्या भरून ठेवायच्या होत्या, कुण्या अज्ञात यज्ञासाठी?
विस्कोट सुरू झाला होता तेव्हाच.
कागदावर सरपटत होते शब्द, जेव्हा
लाथ बसली होती कंबरेत कवितेच्या.
आणि उतावीळ समूह धडपडत होता. हातातले कॅमेरे सरसावून
अभूतपूर्व छायाचित्रण
करता यावे म्हणून
आणि नंतर डोळेच मिटत राहिलेत थकून.
रात्र झाली तर कधीतरी ते
झाकलेले कोंबडे आरवेल
आणि
उजाडेल.

**वसंत वाहोकार**
भ्रमणध्वनी : ८४५९४६४९९०



## शहर

हे शहर पसरलेलं
अस्ताव्यस्त अजगरासारखं
दिवसेंदिवस माणसं
गिळून सुस्तावलेलं...
त्याच्या श्वासागणिक
करपून जातो उभा दिवस,
रात्र अधिकाधिक गडद
धारदार पात्यासारखी...
ह्या शहराच्या थंडपणानं
सूर्य बिचारा धास्तावलेला
पाठीला पाय लावून
चुळबुळत
शेवटचा तास उरकणाऱ्या
दप्तरी पोरासारखा...
पाऊसपाण्यानं तर वाट
केव्हाच बदललेली,
मातीही आता
सीतेच्या काळासारखी
नाही राहिलेली.....

गणगोत–आप्त दुरावलेलं,
शहर उभं–
खरंतर आडवं शांतपणे..
नसानसांत भिनलेली
काळझोप–
आणि शेपटीची वळवळही
थंडावत चाललेली......
...पोटात कुरतडतो
एक सवाल,
भडभडून येतं आत,
–ऐन उमेदीत गरतीसारखं
जगलेल्या ह्या शहरावर
–निदान भडाग्नीची
वेळ येऊ नये..........

**अमिता कोकाटे**
भ्रमणध्वनी : ७७३८३८४५३८

## प्रकाश जिणे

अवकाशाच्या पोकळीत
साचून राहिलेला अंधार
उतरु लागला भूमीवर
हळूहळू! निथळत.
घनघोर काळोखानं
भरुन गेलं अवकाश.
काळोख उपसताना
हात थकून गेले,
शरीर जीर्ण शीर्ण होऊन गेलं,
मन झरुं लागलं,
काळोख मात्र संपत नव्हता,
जिणं असं थांबत नव्हतं.
अचानक एके दिवशी
पाठ सरळ करून उभं राहताना
उजाडल्याचं दिसलं,
प्रकाशाचं नवं वारं वाहताना जाणवलं,
अंधाराला सरावलेले डोळे
क्षणभर दिपून गेले.
जेव्हा उजेड कळला,
तेव्हा मात्र डोळे विस्फारुन पाहूं लागले
आता अंधाराचे डोंगर विरुन गेलेले,
प्रकाशाच्या वाटा
अंधाराला मागे सारून
पुढे सरसावलेल्या.
मी हात पसरून प्रकाशाला,
कवेत घेण्याचा प्रयत्न केला.
प्रकाश छातीत विसावत उतरला,
जिणं प्रकाशानं भरुन गेलं
अंधार मावळला.

**– डॉ. सुलभा कोरे**
भ्रमणध्वनी : ९८२०४६८९१९

## आंदण

अचानक मौन सुटावं
तसा कोसळतोय पाऊस ..
त्याचा अविरत नाद
हुरहुर जागवणारी साद
उरी दाटून आलेलं कितीतरी,
तुझ्या आठवणींच्या सरींसह
कोसळू पाहणारं..

समोरचं हे अथांग तळं
सामावून घेऊ शकेल का,
इतकं सगळं?..

तू धूसर होत चाललेल्या मेघासारखा
आणि तीच कहाणी
पुनरावृत्त होत असलेली..
अख्ख्या शुभ्र कॅनव्हसवरचा
तो काळा ठिपकाच का दिसत राहतोय?
भुंगा बनून आतून पोखरू पाहतोय?
तू शुभ्र अवकाश दाखवत असताना
त्या ठिपक्याचा अथांग डोह का होतोस?

मौन सुटलेल्या आभाळा,
आता तू तरी दे एखादा ढग
त्या ठिपक्याचं अस्तित्व
मिटवू शकणारा
दे घनविभोर थेंबांचं,
राजहंसी आंदण
अवघा डोह
पंखांखाली घेऊ शकणारं...

**– गिरिजा मुरगोडी**
भ्रमणध्वनी : ९४२३०५५५५८

# पुस्तक परिचय

**राजीव जोशी**
भ्रमणध्वनी : ९५९४०७४४५३

**आस**




'आस' या अपर्णा महाजन यांच्या ग्रंथाली प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या १७० पानांच्या कथासंग्रहात एकूण अठरा कथांचा समावेश आहे. संग्रहाचं देखणं मुखपृष्ठ सुप्रसिद्ध चित्रकार अन्वर हुसेन याचं आहे. संग्रहातील तीन कथा – 'हिऱ्याचा हार' ही फ्रेंच कथाकार मोपासा यांची, 'व्यग्र ब्रोकेरची प्रणयकथा' ही अमेरिकन कथालेखक ओ हेन्री यांची आणि 'स्वार्थी राक्षस' ही आयरिश कवी, नाटककार, लेखक ऑस्कर वाईल्ड – अनुवादित आहेत. लेखिकेच्या अनेक कथा नामवंत मासिकांमध्ये प्रकाशित झालेल्या आहेत.

संग्रहाच्या सुरुवातीलाच त्यांनी 'Hold on your dreams, For if dream die, life is a broken winged bird that cannot fly' असं लक्ष वेधून घेणारं 'कोट' टाकलंय. ते सर्जनशीलतेशी संबंधित आहे. कथा सांगतांना वातावरणनिर्मिती होते, आवाजात चढउतार केला जातो, प्रसंगी चित्रविचित्र आवाज काढून उत्कंठा वाढते. त्यांना 'लहान असल्यापासून लोकांचं निरीक्षण करून नकला करण्याची आवड होती. या साऱ्यामुळे कथा या साहित्याप्रकाराबद्दल खूप आपलेपणा वाटतो असं लेखिकेनं मनोगतात म्हटलंय. सूक्ष्म निरीक्षण हा त्यांच्या कथेचा कॅनव्हास आहे. या सवयीचा पुरेपूर वापर त्यांच्या कथालेखनात, कथेच्या बारीकसारीक तपशिलात दिसून येतो. संग्रहाचं मनोगत वाचताना विद्याधर पुंडलिकांनी कथालेखनाच्या अनुभवाबाबत म्हटलेलं आठवलं, माझ्यासारख्या पूर्णत्ववाद्याला एकलय करायला लावणारा हा प्रकार एकदम भावला आणि रुचला. सौंदर्यभावनेची सूक्ष्मता, उत्कटता आणि अचूकता प्रचीतीला आणून देणारी कथेसारखी दुसरी मजा नाही.

तुमच्या–आमच्या जीवनात घडणाऱ्या, सांगण्यासारख्या आणि न सांगता येणाऱ्या, घटना सूक्ष्म निरीक्षणानं टिपल्यावर तयार होणारी गोष्ट वाचकाच्या मनात कथेच्या पातळीवर येते आणि मनात रुंजी घालू लागते. अशा कथापातळीवर येणाऱ्या

अपर्णा महाजन यांच्या कथा म्हणजे आत-बाहेर असणारा संघर्षच आहे, त्यात तक्रार नाही, कटुता नाही, अपराधित्व नाही, असूया तर नाहीच नाही, आलेल्या आयुष्याला सामोरं जाताना प्रचीती येते ती निखळ सोशिकपणाची. पहिल्याच 'काठी' या कथेत खवीस बाप आणि तरुण होत जाणाऱ्या मुलाची सोशिकता यांची गोष्ट आहे, कथेतून दिसत राहतं फक्त मुलाचं एकाकी सोसणं आणि म्हणून बाप मेल्यावर ते सतत उगारणारी काठीच फेकून देण्याची कृती म्हणजे सोशिकतेचा अंत तर होता, वंशपरंपरेनं आलेल्या जुलूमशाहीला शिक्षणामुळे दिलेला नकार सूचित केलेला आहे. संग्रहातील 'आस' या शीर्षककथेत 'गाडीचे डबे एकमेकांना चिकटतात आणि गाडी पुढे जात राहते साऱ्या डब्यांना घेऊन तसं भूतकाळाला घेऊन गोव्यात नव्यानं जगणं सुरू करणाऱ्या प्रभाचा राघवशी झालेला विवाह कौटुंबिक अपघात असेल. तिचं विभक्त होणं वरवर सहज, सरळ वाटत असलं तरी त्याच्याकडून सतार मिळूनही सुरावटीचा सराव न मिळणं यातून या नात्यातील वेदना लेखिका सूचित करते. असं असलं तरी राघवपासून विभक्त झाल्यावर तिचं नोकरीसाठी गोव्यात येणं, भूतकाळाशी संवाद साधत गोव्यात समुद्राच्या वाऱ्यात, चमचम चांदण्याच्या ढगात, भावभावनांच्या गर्दीत मोकळंढाकळं होताना रंगीन आयुष्यात सतारीचा रियाज आणि मनाच्या तारा छेडल्या जाणं, कॉलेजमधला सहकारी डेविडचं जीवनात येणं आणि आजवर अव्यक्त माया, प्रेम आणि आकर्षण म्हणजे समुद्राच्या लाटेनं सत्व सोडून किनाऱ्याकडे झेपावणं होतं. अतिशय नजाकतीनं लेखिका प्रभाच्या मनाचा थांग घेते. निर्णय या कथेतली सुषमा संस्कारक्षम कुटुंबातील, आकर्षक व्यक्तिमत्त्वाची, दहावीच्या बोर्डात केंद्रात प्रथम आलेली, बिसनेस मॅनेजमेंट करून काच कंपनीत नोकरी करणारी, तिचं लग्न विवाहसंस्थेद्वारा समीरणशी ठरतं. समीरण व्यावसायिक, घर सुशिक्षित, आई शिक्षिका, वडील मामलेदार, बहीण डॉक्टर, स्वतःचा दवाखाना. खरं तर सुषमाला हे स्थळ फारसं रुचलेलं नसतं, आईसाठी ती तयार होते. सुषमाच्या आईच्या पायावर चांदव्यासारखा पांढरे डाग असतो. त्याच आजारपणाचं निमित्त होऊन डॉक्टर बहिणीच्या दवाखानात उपचाराला जाते. ज्या घराशी संबंध जुळलेले त्यांना या गोष्टी स्पष्ट कराव्या या हेतूनं आई तिला सर्व सांगते. आणि मग मानवी वृत्तीनं, स्त्री सुलभतेने घडणारं कौटुंबिक नाट्य. पांढरे डाग वंशपरंपरेनं पुढच्या पिढीत येऊ शकतात असे डॉक्टरचे विचार आणि होणाऱ्या नवऱ्याने, सासू-सासऱ्यांच मूक राहणं पाहून साखरपुड्यापर्यंत गोष्टी जाऊनही, सुषमा त्यांच्या सुशिक्षितपणाचा बुरखा फाडते आणि मानानं, कटुता न ठेवता नम्रपणे नकार सांगते. या ठिकाणी सुषमाची व्यक्तिरेखा लेखिका आजच्या काळाचा पार्श्वभूमीवर काहीशा डॅशिंगपणे रेखाटतात. लेखिका अध्यापक होत्या त्यामुळे महाविद्यालयातील वातावरण, नोकरीत चालणारे हेवेदावे, सहयोगी प्राध्यापकांमधील राजकारण याची त्यांना चांगली कल्पना आहे,

अनुभव आहे. यात होतकरू आणि प्रामाणिक प्राध्यापकाचा कसा बळी जातो हे 'बळी' या कथेत त्या चित्रित करतात. संग्रहातल्या कथा या तुमच्या-आमच्या भोवतालात घडणाऱ्या घटना आहेत, त्या अतिशय सुरसपणे, वातावरण, स्वभाव वैशिष्ट्ये यासह लेखिका मांडते. लेखिकेकडे सूक्ष्म निरीक्षणशक्ती आहे, शब्दकळा आहे, मात्र कधी कधी त्या व्यक्तिरेखेत खोलवर न शिरता, तपशिलात वंशपरंपरेवर सोडून देतात. उदाहरणार्थ, 'काठ' कथेमधील गोविंदाच्या वडिलांच्या व्यक्तिरेखेचा उल्लेख करता येईल. त्यांच्या असंगत वागण्याचा, आई आणि गुरंढोर यांना अकारण काठी उगारण्याची मीमांसा वंशपरंपरेवर सोडून देण्यात. व्यक्तिरेखेचा विकास खुंटतो. असं असली तरी 'हरवलेली सावली' या कथेत होस्टेलचं वातावरण, तेथील धावाधाव, उत्साह, तारुण्याची सळसळ लेखिका ताकदीनं उभं करते. यात प्रेमाचा त्रिकोण आहे, ऑमित, मेघना आणि प्रकाश. ऑमित-मेघनाला एकत्र आणताना प्रकाशचं प्रेम अस्फुट राहतं. तो ते सूचकपणे व्यक्त करतो. नात्याचे नाजूक धागे लेखिका नजाकतीने ते सुचवते, प्रयोगशाळेत शास्त्रज्ञ असलेला प्रकाश आत्महत्या करतो तेव्हा वाचकही सुन्न होतो.

एकंदरीत 'आस'मधील माणसांचा संघर्ष परिस्थितीशी, कधी स्वतःशी आणि नियतीशी आहे, तो रूढार्थानं आपल्या भोवतालातला आहे. कधी धुंद करणारा, तर कधी वास्तवाची तीव्र जाणीव करून देणारा आहे.

**आस (कथासंग्रह)**
अपर्णा महाजन
ग्रंथाली प्रकाशन
मुखपृष्ठ : अन्वर हुसेन
पृष्ठे १८४, मूल्य : रु.२००/-

**अमृतस्पर्श**

संवेदनशील कवी, कादंबरीकार विजय शेंडगे यांचा 'अमृतस्पर्श' हा २१६ पानांचा कथासंग्रह पुण्याच्या शांती पब्लिकेशननं प्रकाशित केलेला आहे. संग्रहात एकूण आठ कथा आहेत. मुखपृष्ठ श्रीकृष्ण ढोरे यांचं आहे. 'अमृतस्पर्श'मधील कथा संवेदनशीलता आणि असंवेदनशीलता, विकृती आणि संस्कृती यातील संघर्ष आहे. अमृतस्पर्श हा त्यांचा पहिलाच कथासंग्रह आहे. संग्रहातील त्यांची एकूणच कथा परंपरेला छेद आणि संस्कृतीला हादरे देत, प्रेम हेच नैतिकता असल्याचे सांगणारी आहे. प्रेम हे नैसर्गिक असल्यामुळे मूल्यांची श्रेष्ठता अस्सल प्रेमसंबंध आहे ही त्यांच्या कथांची टॅग लाइन आहे. बायशी ही त्यांची गाजलेली कथा आहे. तारुण्यात प्रेमात पडलेल्या प्रभाकर




आणि बायशी यांचं लग्न प्रत्यक्षात वेगवेगळ्या जोडीदाराबरोबर होतं. दोघंही धनगर समाजातले असले तरी, प्रभाकरचं कुटुंब एकाच गावात स्थिर आणि बायशीच्या बापाचं बिऱ्हाड मोलमजुरीसाठी सालोसाल गावोगावी भटकंती करणारं. प्रभाकर आणि बायशी पूर्वार्धातील प्रेमात गुंतून गेल्यावर, बायशीच्या बापानं गाव सोडणं, दारुड्या नवऱ्याचं सासर, आप्तांचे लगोलग मृत्यू, नवऱ्यावर व्यसनानं झालेलं कर्ज, त्यासाठी तिला विकणं, तिचं वेश्यावस्तीत येणं, धंद्याला लागणं या नियतीच्या क्रूर खेळाचं वर्णन वेगानं आणि प्रभावानं कथानकात येतं. प्रभाकर आणि बायशी एकमेकांना विसरलेले नसतात म्हणूनच अकस्मात भेटीतली ओळख, ओढ, आठवणी मनात उजळून येतात. मात्र, सगळे मोह नाकारून बायशी वास्तवाशी तडजोड करत नाही आणि प्रभाकरला सांगते की सभ्य समाजापेक्षा वेश्यावस्तीतील स्त्रीचं एकाकी जगणं सुरक्षित असतं. दोघांच्याही मनाचा संघर्ष वाचकाला खिळवून ठेवतो.

माणूस आपल्या जीवनात हरवलेला आनंद, प्रेम मिळवण्याचा प्रयत्न करत असतो आणि या प्रयत्नात नैतिक आणि अनैतिक या तशा रिलेटिव्ह टर्म आहेत. अनैतिक कथेत सुहास-गीता आणि प्रथम हा त्रिकोण आहे. सुहास आणि गीता यांच्या लग्नात पुढाकार असलेला प्रथम विवाहित असतो. प्रथम आणि गीता एकाच बँकेच्या वेगळ्या शाखांमधील सहकारी, प्रथम मनोमन गीतात गुंतलेला असतो, मेसेजनं तिच्या मनोविश्वाच्या संपर्कात राहण्यासाठी धडपडत असतो. सुहासशी लग्न होऊनही, संसारावर एक फूल उमलूनही, सुहासच रुक्ष वागणं, नशेच्या आहारी जाणं यामुळे भूक लागल्यावर चूल पेटवण्यासाठी चुलीत लाकडं घालावी इतपत संसार असतो. ना बायकोबद्दल ओढ, ना मुलाबद्दल पितृप्रेम. परिणामी, संसारातील अतृप्ती, प्रेमासाठी आसुसलेपण.. गीता इच्छे-अनिच्छेनं प्रथमकडे मनानं ओढली जाते कारण तो जीवापाड प्रेम करतो, सतत समजून घेत असतो, प्रेमाच्या पायघड्या घालत असतो, फुलांसारखं झेलतो. त्याचं तिच्यावर निस्सीम प्रेम असतं, कधी घेतलाच तुझा हात हातात तर त्यात केवळ निरागसता असेल वासनेचा लवलेशही नसेल, अशी प्लॅटोनिक भावना असते. ती दिवस-रात्र स्वप्नातही गुंतत जाते, त्याच विचारात त्याच्या जाण्याची बातमी आणि मग तिची धावपळ, त्याच्या घरी जाणं, त्याच्या बायकोचं सांत्वन वगैरे. ती त्याचा हात थंड हात हातात घेते आणि.. पण हे स्वप्न असतं. गीता एक संभ्रमित व्यक्ती

नैतिकता आणि अनैकतिकतेत अडकलेली. समाजनियमांचं बंधन झुगारून अतृप्त इच्छांसाठी विवाहित स्त्रीनं शारीर-अशरीरी प्रेम करावं का, नैसर्गिक उर्मी आणि भूक शारिरीप्रमाणे अशरीरी असते असं लेखक आपल्या कथांमधून सूचित करण्याचा प्रयत्न करतो. मुळात एखादा वाचक एखाद्या लेखकाच्या कथा वाचत सुटतो ते त्यातील विषयाचे, अनुभवाचा विस्तृत पट पाहून. हा पट वाचकाच्या अनुभवविश्वालाही संपन्न करत जातो. शेंडगे यांच्या बहुतकरून कथा स्त्रीच्या जीवनातील अतृप्ती, असमाधान, फरफट आदी विषयांना भिडणाऱ्या आहेत. त्यांची अफाट निरीक्षणशक्ती, व्यक्तिमत्त्वाचा, माणसामाणसातील परस्परसंबंध, देहबोलीचा आणि मानसिकतेचा अभ्यास, त्यातले बारीकसारीक तपशील यामुळे कथा समृद्ध करत जातो. वाचकांना कथानकाच्या गतीत खिळवून ठेवतो. त्यामुळे त्यांच्या कथांतल्या व्यक्तिरेखा सजीव होतात. विटाळ, दत्तक यासारख्या काही कथांमधील कच्चे दुवे, तर्काला न पटणारे संदर्भ, पात्रांचे संबंध आदी सोडता शेंडगे कथांची मांडणी समर्थपणे हाताळतात, पेलतात.

**अमृतस्पर्श (कथासंग्रह)**
लेखक : विजय शेंडगे
प्रकाशक शांती पब्लिकेशन्स, पुणे
पृष्ठे : २१६, मूल्य : रु. ३००/-

**वादी नव्हे, स्त्रीसंवादी कविता – बायका झुळझुळत ठेवतात आयुष्याचा पदर**

'तो सोबत असला काय किंवा नसला काय, काहीच फरक पडत नाही त्यांना, त्या सुसाटतात वाऱ्याला पाठी टाकत, आपलं स्टेअरिंग आपल्याच हातात घेऊन' या आहेत संगीता अरबुणे यांच्या 'बायका झुळझुळत ठेवतात आयुष्याचा पदर' या




संग्रहातील शेवटच्या ५२व्या कवितेतील शेवटच्या काही ओळी. या ओळींना शतकानुशतकाच्या स्त्रीचा करारी तसंच आजच्या समकालातल्या बाईचा चेहरा लाभलेला आहे, कुणाला झाशीची राणी दिसेल, कुणाला अहिल्यादेवी होळकर आणि इंदिरा गांधीसुद्धा. संगीता अरबुणे यांनी उदगीर संमेलनात नुकताच प्रसिद्ध झालेला संग्रह हातात दिला आणि मनात आलं पुन्हा एक स्त्रीवादी? मात्र, कविता वाचताना लक्षात आल की संगीता अरबुने हुशार कवयित्री आहे. घरी आलेल्या पाहुण्याला चहा द्यायचा की कॉफी, पोहे की उपमा, की गोड

बोलून आल्या पावली.. हे स्त्री हुशारीनं ठरवत असते. तद्वत कवितेत काय द्यायचं, काय मांडायचं, कसं सांगायचं याचं भान तिच्याजवळ आहे. दररोजच्या जीवनात घरी वा दारी, पुरुषाबरोबरचं सहजीवन अटळ असताना ही कवयित्री पुरुषी संस्कृतीवर कोरडे ओढत बसत नाही, तक्रार करत बसत नाही, तर आपल्या अवतीभोवती वावरणाऱ्या बायकांचं, त्यांच्या जीवनाचं, सवयीचं, मनाच्या विविध कंगोऱ्यांचं, प्रतिसादाचं, लकबींचं सूक्ष्म निरीक्षण करून आधुनिक काळातील स्त्रीचं जीवन, त्यात असलेल्या आणि नसलेल्या असंख्य भावभावनांसह, संसारात असणारे असंख्य न संपणारे प्रश्न, भवतालातील माणसांची वृत्ती-प्रवृत्ती यांचा ठाव मोठ्या नजाकतीनं आपल्या कवितेत मांडते. इतकेच नाही, स्त्रीच्या रोजच्या जगण्यातले आणि त्यातल्या बारीकसारीक कृतीतले अर्थही अलगद उलगडून सांगते. आता बघा ना, प्रत्येक घरातील मुली, स्त्रिया, सुना ब्युटीपार्लरमध्ये जातात. पार्लरमधील बारीक बारीक तपशिलासह बायकांच्या पार्लरमध्ये जाण्याचा विचार करताना ती आपल्या पहिल्याच कवितेत म्हणते, 'फक्त त्वचेचा पोतच सुधारायचा असतो त्यांना असं नाही, तर निथळू द्यायचे असतात त्यांना, त्वचेच्या अंत:स्तराला चिकटून संसर्ग करू पाहणारे, नको असलेल्या स्पर्शाचे कण न कण, शिवाय वाळवीसारखे पोखरत जाणारे कुणाकुणाचे लागट बोलही निथळून जातील वाटतं त्यांना.' या ठिकाणी पोखरणारं दिसत नाही आणि काय पोखरताय हे सांगताही येत नाही, वाळवीच्या प्रतिमेचं उपयोजन अशा पोखरणाऱ्या वृत्ती निर्देशित करण्यासाठी चपखलपणे केलेलं आहे. शेवटी ती म्हणते, 'बायका जात राहतात पार्लरमध्ये, नुसतं सुंदर दिसण्यासाठी नाही तर, समेटून घ्यायचं असतं त्यांना आपलं विस्कटलेलं बाईपण.' पार्लरमध्ये जाणाऱ्या असंख्य बायकांनासुद्धा या भावना नव्याने जाणवणाऱ्या व विचार करायला लावणाऱ्या असाव्यात.

बायका झुळझुळत ठेवतात आयुष्याचा पदर: हा ६६ पानांचा कवितासंग्रह ग्रंथालीनं प्रसिद्ध केलेला आहे. सूचक असं मुखपृष्ठ माझे आवडते चित्रकार सतीश भावसार याचं आहे. संग्रहातील स्त्रीजीवन केंद्रस्थानी ठेवून ५२ कवितांच्या मालिका म्हणजे हाडामांसाशिवाय उभ्या केलेल्या स्त्रीवृत्तीरेखा आहेत. ती फक्त शब्दांत मांडते आणि बघता बघता शब्द उभी करतात अनेक शरीरांशिवाय असलेले असंख्य चेहरे स्त्रीच्या शारीरिक-मानसिक सनातन वेदनेचे, व्यथेचे. 'बायका, नवऱ्या-मुलात, वाटून टाकतात स्वतःला, उरल्यासुरल्या वाहून जातात. दर महिन्याला, आणि बघता बघता, पांढरेफटक पुतळे होतात बायका.' काहीही न बोलता, शब्द उभी करतात एक नैसर्गिक वेदना आणि या वेदनेचं व्यक्तिगत आणि सामाजिक साईड इफेक्ट म्हणून ६ नंबरची कविता. 'आई गं.., किती या वेदना, ओटीपोट, पोटऱ्या, कंबर, पाय. वेदना असह्य होतात तेव्हा कण्हते, कुथते, असंबद्ध कोसते, म्हणते, बये सावित्री, तू पाटी पेन्सिल हातात

दिलीस, पण लाटणं काही सुटलं नाही बघ.' खरंच स्त्रीला काहीही सुटत नाही, संसारातले टक्के-टोणपे न चुकणारे, त्यातून संसाराला हातभार लागावा म्हणून बस, लोकल, कार्यालय, त्यात आरपार छेदणाऱ्या नजरा, शारीर लगट, बॉसपासून प्यूनपर्यंत, पद कोणतही असलं तरी, एकच अनुभव. ही संपूर्ण कविता 'त्या काळात' स्त्रीला जाव्या लागणाऱ्या विविध शारीरिक आणि मानसिक भावावस्थेचा उच्चार आहे आणि भाष्यही. जसे निसर्गात सतत बदलाचं चक्र चालू असतं तसेच बदल, इच्छा असो नसो, स्त्रीला जन्मापासून अनुभवावे लागतात; मग कधी शारीरिक, सामाजिक, कौटुंबिक. अशीच एक अवस्था म्हणजे मेनॉपॉज. या अवस्थांतरात होणारे शारीरिक, मानसिक बदल अरबुने निर्भीडपणे मांडतात. आजवर, कथा-कादंबरीत गद्यामध्ये या विषयावर भरपूर लिखाण झालं असलं तरी कवितेत इतकं थेट कदाचित विरळाच आणि कवयित्रीचा निष्कर्ष : मेनॉपॉजच्या दिवसात, कधी कधी बाई पुरुष होत जाते.

बायका एकमेकींशी खूप बोलतात, संपता संपतच नाही कधी बायकांच्या गप्पा हे कोणत्याही पुरुषाचं निरीक्षण असलं तरी ते मांडण्याचं धाडस त्याच्यात नसतं. स्वत: कवियित्री हे निरीक्षण मांडताना म्हणते, 'बायका एकमेकींशी खूप बोलतात, या विषयावरून त्या विषयावर सहज घरंगळतात, त्यांच्याकडे नसते विषयांना कमी आणि विषयांसाठी कुठलीच जागा वर्ज्य.' बायका खूप गॉसिप करतात असंही ती एका कवितेत म्हणते. बायका खूप बोलतात आणि मुक्यानं सोसतातही खूप. पुरुषांची बरोबरी करत राहिल्या तरी 'सोडत नाही कधीच आपल्या आतल्या बाईचा हात.' आजकाल बायकांवर खूप लिहून येतंय, स्त्रिया लिहीत आहेत, पुरुषही. अरबुने, या सर्व बाई समजण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना ठणकावून सांगतात, की 'त्यांच्या असण्यावर जाऊ नका, त्यांच्या दिसण्यावरही जाऊ नका, कळणारही नाही सावली होत त्या कधी खेचून आणतील अख्खं ऊन..' कशाला हवाय बाई समजून घ्यायचा यत्न असा थेट प्रश्न विचारून ती म्हणते, 'बाई एक कोडं, बाई एक गूढ. ती आहे पृथ्वीतत्त्व आणि तिच्याच ठायी सृजनाचा खळाळणारा स्रोत. तीच देते जीवनाची गोजिरवाणी चाहूल आणि तीच आहे प्रकृती पुरुषाला पडलेली लोभसवाणी भूल.' काही काही कवितांत पुरुषी वर्चस्वाला भिडण्याचं धाडससुद्धा तिनं दाखवलंय. 'काळझोपेतून जाग्या झाल्या आहेत बायका, काचेच्या भांड्यांसारखे खळकन आता फुटताय पुरुष' याची जाणीव करून द्यायला ती विसरत नाही. तिनं एका कवितेत म्हटलंच आहे, 'बाई सोडत नाही कधीच आपल्या आतल्या बाईचा हात.'


समकालातील बाई 'जशी आहे तशी' संगीता अरबुणे आपल्या कवितांत दाखवतात. एकविसाव्या शतकातल्या स्त्रीचं हे एका अर्थाने डॉक्युमेंटेशन आहे. 'कपाळावर चंद्र गोंदणाऱ्या बायका ओंजळीत सूर्य घेऊन मिरवू लागल्यात आजकाल,

नदी होऊन झुळझुळत समुद्राकडे जाणाऱ्या बायका, स्वतःच समुद्र होऊन उधाणू लागल्यात आजकाल' हेच ते कालातीत शब्दचित्र. अरबुने यांची कविता म्हणजे एक मोठा आरसा आहे आणि त्यात कॅलिडोस्कोपमध्ये दिसावेत तसे स्त्रीच्या विविध रंगबिरंगी पैलू वाचकांना दिसत राहतात, स्त्रियांनाही नव्यानं दिसत राहतील. त्यांची कविता स्त्रीवादाची नाही. त्यात वाद नाही, विवाद तर नाहीच नाही, आहे फक्त संवाद. म्हणून ती खऱ्या अर्थानं एका बाईनं बाईशी केलेल्या स्त्रीसंवादाची कविता आहे असं मला वाटतं.

**बायका झुळझुळत ठेवतात आयुष्याचा पदर (कवितासंग्रह)**
कवयित्री : संगीता अरबुने
ग्रंथाली, मुंबई
पृष्ठे : ७४, मूल्य : रु. १००/-

**ऐन विणीच्या हंगामात**

गडचिरोलीच्या पुनीत मातकर या तरुण कवीचा 'ऐन विणीच्या हंगामात' हा कवितासंग्रह लोकवाङ्मय गृहानं प्रकाशित केलेला आहे. संग्रहाला सुप्रसिद्ध चित्रकार सरदार जाधव याचं देखणं मुखपृष्ठ, कवी अजित अभंग यांची रेखाचित्रं आणि सुप्रसिद्ध




समीक्षक प्रा. रणधीर शिंदे यांची पाठराखण लाभलेली आहे. पुनीतने, घराचे भक्कम खांब बनून, आई-बाबांचा संसार तोलून धरणाऱ्या चार बहिणींना संग्रह समर्पित केलाय. हे सांगण्याचं कारण तो आपलं विश्व त्यातल्या सर्व घटकांसह म्हणजे आई, वडील, बहिणी, शेतीवाडी, त्यातले काबाडकष्ट, पावसावर अवलंबून राहणं, अवकाळात बळिराजाचं कोलमडून जाणं, डोळ्यांदेखत होणाऱ्या आत्महत्या हे सारं साठवून आहेच, त्याच्या आणि त्याच्या भोवतालच्या एकूणच समाजजीवनाचा ते अविभाज्य भाग आहेत. अर्पणपत्रिका म्हणूनच मला कवी-लेखकाच्या मनाचा यूएसपी वाटत आलेला आहे.

संग्रहात जवळपास ८४ कविता- हे कोणते ऋतू आलेत?, गळून पडते झूल, उत्तराचे कोवळे डोळे, असे दंश मोरपंखी, अपूर्ण कवितांच्या वहीतून, अबोल नोंदवहीवरची धूळ, हजारो इंगळ्यांच्या दंशातून - अशा सात विभागांत विभागलेल्या आहेत. विभागांची शीर्षकं कवीच्या काव्यविषयक भूमिकेचं सूचन करतात हे जरी

खरं असलं तरी त्याशिवायही कवी आणि त्याच्या काव्य व्यक्तिमत्त्वाचा भाव संग्रहात एकसंध जाणवत राहतो.

सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक अशा सर्वच क्षेत्रात एकविसावं शतक म्हणजे मोठा संभ्रम आहे. आधीच जागतिकीकरणानं खिळखिळ्या झालेल्या मानवी जीवनाला कोरोनाच्या रूपातली आणि त्यानंतर अलीकडील देशातली, जगभर दिसणारी युद्धजन्य परीस्थिती, त्यातून उद्‌भवलेली अस्थिरता यामुळे अस्तित्वासाठी निकराची लढाई, संघर्ष करावा लागतोय. एकवेळ त्यातही माणूस उभं राहू शकेल, पण माणसा-माणसात या ना त्या कारणानं वाढत चाललेल्या दऱ्या, माणसांचा एकमेकांपासून तुटणं, खोटंखोटं वागणं, जातीय-पक्षीय-धार्मिक वादविवाद आणि एकमेकांवरचा अविश्वास अशा अनेक गोष्टींमुळे एकविसाव्या शतकात समाजमन ढवळून निघालंय, पिचून गेलंय. हा संघर्ष म्हणजे यादवी तर नव्हे, मानवी विनाशाची चाहूल तर नव्हे असं वाटून समाज भयग्रस्त अवस्थेत पोचलाय. हे कोणते ऋतू आलेत, हे कोणते दिवस आलेत, हे कोणते प्रहर असावेत, ही कोणती नक्षत्रं म्हणावीत, हा कुठला प्रवास असावा, ही कोणती माणसं असावीत, असे मनात येणारे निरुत्तर करणारे प्रश्न केवळ कवीचे नाहीत, तर समकालीन पिढीचे आहेत. या पार्श्वभूमीवर, 'ऐन विणीच्या हंगामात' एकविसाव्या शतकातला तरुण कवी म्हणून पुनीत मातकर यांच्या कवितांकडे बघावं लागेल. ढासळत गेलेली कुटुंब व्यवस्था, कोलमडलेली समाजव्यवस्था, असमंजस, असहिष्णू राजकीय व्यवस्था, वाढती दंडुकेशाही असं काळाचं भागधेय घेऊन आलेली बांडगुळांचा इतिहास, हीच मुळात एक स्वतंत्र बांडगूळ व्यवस्था निर्माण झाली आहे असं कवी मानतो.

विवेकानं ठोठावत राहावं, मनाचं निगरगट्ट दार, ओढत न्यावं स्वार्थी जिणं, कोडगेपणाच्या पायऱ्यांवरून. हा कुठला प्रवास असावा हे पहिल्या सेगमेंटचं कोट. ही धूळमाखल्या आयुष्याची आरास म्हणजे गावगाड्यातले हतबल श्वास आहेत. ही हतबलता 'चित्र' या कवितेत अधिक गडद होते. डोळ्यांतील स्वप्नांना तो जखमी चंद्राची उपमा देताना म्हणतो, जे चिरत नेतात आतल्याआत माणूसपण. कवीला थोडाफार आशावाद दिसतोही, पण, हा कभिन्न पडदा उजळेलही, उमेदीच्या शलाकांनी. तरीही चाल करून येणाऱ्या या वर्तमानाचं काय करावं, हा प्रश्न आत्मपरीक्षण करायला मजबूर करतो. आजचं वर्तमान म्हणजे बांडगुळाचा इतिहास आहे असं सांगताना कवी, माकड अजून जिवंत आहे म्हणतो, आज जे नेतृत्वाच्या आविर्भावात आहेत ते 'कुठल्याच लढाईत ते सेनापती नव्हते. एखादी मोहीमही फत्ते नाही केली सरदार म्हणून, भाला, तीर, गोळी, तलवार कुठलंही निशाण नाही त्यांच्या छातीवर, तरीही तुमच्या समोर छाती काढून ते उभे आहेत शब्दांचा फुलोर घेऊन कोडगेपणानं. सरदार-सेनापतीच्या

प्रतिमांतून केलेलं हे वर्तमानाचं निरीक्षण आहे, भाष्य आहे. असं असूनही बांडगुळाच्या फांद्या खांद्यावर घेऊन नाचत असाल, त्यांच्याकडून विश्वासाची हिरवीगर्द सावली, कल्याणाची सुगंधी फुलं आणि समृद्धीची मधुर फळं यांची अपेक्षा करत असाल कवी ठणकावून सांगतो, तर समजून घ्या, शेपूट गळून पडलं तरी तुमच्यातलं माकड अजून जिवंत आहे. गडचिरोली म्हणजे तेथील जंगलं, आदिवासींचं जगणं, नक्षली भागातल्या जगण्यातील भय आणि भीती, दंडुकेशाही, सामाजिक आणि व्यक्तिगत विकासाचा अभाव. सरकारी भाषेत काळ्यापाण्याची शिक्षा भोगण्याचं, औकात दाखवण्यासाठी परवलीचा शब्द बनलेलं गाव म्हणजे गडचिरोली. याच शीर्षकाच्या कवितेत, कवी त्याच्या नजरेनं, त्याच्या कॅमेरानं विदारक गडचिरोलीचं प्रतीकात्मक दर्शन घडवतो. विचारतो, मायबाप, खरंच सांगा, आमच्या अर्धनग्न देहाआड, करपलेल्या काळजात, अन् विझत जाणाऱ्या, कोरड्याठाक डोळ्यांत, तुम्ही शेवटलं, कधी डोकावून पाहिलंय..? मात्र त्यावरचं कवीचं भाष्य हलवून टाकणारं आहे– सत्य मात्र एवढंच, बंदूक असो कोणाच्याही हाती, गोळीवर मात्र आमचंच नावं लिहिलंय. या विभागातल्या, सतरंजी, चरैवेति आदि कविता लक्षणीय व अस्वस्थ करणाऱ्या आहेत. ग्रंथ, पुस्तकं हेच माणसांचे खरे मित्र, मार्गदर्शक असतात म्हणून आजच्या परिप्रेक्ष्यात माणसांपेक्षा पुस्तकांचा सहवास हीच श्रीमंती आहे. पुस्तकं या कवितेत पुस्तकं आणि माणसं यांच्यावर तुलनात्मक भाष्य आहे – पुस्तकांना खेद वाटतो, माणसं शब्दांना जगात नाही, पुस्तकं लिहिणारी माणसंसुद्धा, पुस्तकांसारखी वागत नाही. अतिशय मार्मिक असं निरीक्षण कवीनं नोंदवलेलं आहे.

दुसऱ्या विभागातल्या कवितांमध्ये गाव, गावची लाल, तांबडी, जांभी माती, संसाराचा गाडा ओढणारा बाप, मिरगाच्या चाहुलीनं झाडाला फुटणारे हिरवे डोळे, गावाचं पान्हावणं, मिरगाच्या आशेवर दरसाल फसलेले आडाखे, अंदाज, गावाच्या खोल डोळ्यांतली कणवेची ओल, न फिरकणारं गणगोत, शहरानं बेमालूम पळवलेली गावची पाखरं आणि कधी काळी भोळासांब असलेल्या गावाचं अर्धशहरीग्रामेश्वर स्वरूप याचं एक विदारक चित्र कवी वाचकांसमोर ठेवतो. गृहीत असतं त्याचं असणं तो दुनियेत असताना, आलम दुनिया नसते आपली तो दुनियेत नसताना 'बापपण', 'इच्छा' या कवितांतून, एकीकडे म्हातारे आई-बाप आणि दुसरीकडे बायको यात होणारी कुतरओढ म्हणजे स्वप्नात गावाचं खिजवणं आणि दिवसा शहराचं झिजवणं. साहेबराव करपे यांच्या उदाहरणातून बापाचं चित्र रंगवतो. तर 'निगेटिव्ह रसाला', 'नकळत' यांसारख्या कवितांतून शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा, त्यातील कारणांचा, उद्भवलेल्या परिस्थितीचा शोध घेण्याचा प्रयत्न कवी करतो. मानेभोवती दोराची गाठ हळूहळू घट्ट करत नेताना त्याच्या डोळ्यांत काय बरं थरथरलं असेल असा प्रश्न कवीच्या मनात येतो. मृगधारा

बरसल्या की हिरवा पिसारा, गारव्याची धून आणि अंगभर शहारा, सौमित्रचे शब्द, वाफाळलेली कॉफी, उबदार शाल आणि मस्त कांदाभजी हे शहरी लोकांचं रोमँटिक चित्र. मात्र गावात जुनाच कासरा, बँकांपुढच्या रांगा, सावकाराकडे चकरा, कृषी केंद्राचं बापाला अव्वासव्वा नाडवणं, गळक्या कौलांचं भांड्यांशी सख्य, पिठासोबत मळलेलं चुलीचं दुःखं असं भयाण वास्तव कवी उभं करतो. आत्महत्येचे कुटुंबावर भीषण परिणाम– मानसिक, आर्थिक अंगाने मांडताना पुनीतमधील कवी त्यामागच्या कारणांकडे अंगुलीनिर्देश करतो. पावसाला माती आणि माणसांची कदर कर म्हणून पदर पसरून विनवतो आणि कवी सौमित्रला विचारतो, सांग तुझा रोमँटिसिझम मी अनुभवू कसा?

मातकरांची कविता प्रतिमा–प्रतीकांच्या भाषेत न बोलता थेट, सहज संवाद साधणारी आहे. कधी कधी त्यातल्या उत्कटतेनं ती सरळच भिडते. दुसरं म्हणजे त्यात कमालीची आत्मनिष्ठता आणि प्रखर समाजनिष्ठता आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयाकडे किंवा सामाजिक उतरंडीकडे वरवर न पाहता गांभीर्यानं पाहतो. सूक्ष्म निरीक्षणवृत्तीनं कवी जगाच्या व्यवहाराला नेणीवेच्या पातळीवर आणतो. सावित्रीमायेनं डोळ्याला लावलेला पदर समस्त स्त्रीजातीची होणारी घुसमट दर्शवते. बाबासाहेबांच्या फोटोला हार घालून समतेच्या घोषणा देत शाहू–फुले यांच्या विचारांना तोंडी लावताना आजवर बासनात बांधलेलं संविधान केवळ उद्याच्या भाषणासाठी बाहेर काढणं या विचार आणि कृतीतील विसंगतीवर तो बोट ठेवतो, स्वयंघोषित पुढाऱ्यांचा मुखवटा उतरवतो.

कवितेकडे केवळ एक साहित्यिक अभिव्यक्ती आयसोलेशनमध्ये बघता येत नाही. समकाळातल्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक, राजकीय, आणि तात्त्विक बाजूंनी बघितलं तर कवितेतून अनेक अर्थ प्रसारण पावत असतात, आशय अधिक व्यापक होत जातो. पुनीत मातकर यांचा हा पहिलाच संग्रह आहे. थोड्याशा संपादकीय संस्कारांनी सुसूत्रता आणता आली असती हे जरी खरं असलं तरी डावं–उजवं, इझम–बिझम, धर्म–बिर्म या पलीकडे जाऊन निखळ माणूसपणाच्या आवेगानं जागतिकीकरण, कोरोनाच्या संक्रमण आणि संभ्रमकाळात सावरू पाहणाऱ्या समाजमनाची ही प्रामाणिक कैफियत आहे असं म्हणता येईल.

**ऐन विणीच्या हंगामात (कवितासंग्रह)**

कवी : पुनीत मातकर

प्रकाशक : लोकवाङ्मय गृह

पृष्ठे : १९२, मूल्य : रु.२५०/–

# २१ जुलै

महाराष्ट्राच्या साहित्य, सांस्कृतिक, नाट्यक्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा निर्माण करणाऱ्या, मुंबई मराठी साहित्य संघाचा वर्धापनदिन

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यालय मुंबईतून पुण्यात हलवण्यात आल्यावर मुंबईतही तशी एक मराठी भाषेचे जतन व संवर्धन करणारी संस्था असावी, असा ठराव १९३४ सालच्या साहित्य संमेलनात करण्यात आला. त्याच्या फलस्वरूप २१ जुलै, १९३५ रोजी मुंबई मराठी साहित्य संघाची स्थापना करण्यात आली. संस्थेचे पहिले कार्यालय संस्थापक डॉ अ.ना. भालेराव यांच्या गिरगावातील नारायण-सदन या निवासस्थानी सुरु झाले.१९३४ साली मुंबई येथे भरलेल्या मुंबई आणि उपनगर साहित्य संमेलनाच्या पहिल्या अधिवेशनचे स्वागताध्यक्ष म्हणून प्रा. अ.बा. गजेंद्रगडकर यांची नियुक्ती झाली. या अधिवेशनापासून साहित्यिक स्वरूपाचे स्थायी कार्य करण्यासाठी अशी संस्था स्थापन करण्याची कल्पना निघाली. साधनांच्या मर्यादेप्रमाणे साहित्य संघाचे प्रारंभीचे कार्य मर्यादित राहिले. मुंबई व उपनगर भागांत वार्षिक साहित्य संमेलने भरवणे, साहित्यविषयक प्रासंगिक चर्चा घडवून आणणे, आल्या-गेल्या साहित्यिकांचा परामर्श घेणे, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे वर्ग चालवणे, स्वतःची नियतकालिके चालवणे, कै. वामन मल्हार जोशी स्मरणार्थ दरसाल एखाद्या विद्वान वक्त्यांची पूर्वनियोजित व्याख्याने करवून ती शक्य तेव्हा पुस्तकरूपाने प्रसिद्ध करणे, व्याख्यानमाला चालवणे, असे या कार्याचे विविध प्रकारचे स्वरूप होते.

१९३८ साली स्वा.सावरकर व १९५० साली राजकवी यशवंत यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत महाराष्ट्र साहित्य संमेलने भरली ती संघाच्याच वतीने. तथापि, १९४१ साली मुंबईस संघाच्या विद्यमाने भरलेले महाराष्ट्र नाटयसंमेलनाचे ३२ वे अधिवेशन संघाच्या कार्यास जरा निराळी व जोराची कलाटणी देण्यास कारणीभूत ठरले. मराठी रंगभूमीस १९४३ साली १०० वर्षे पूर्ण होतात हे लक्षांत घेऊन त्यावर्षी महोत्सव करण्याची कल्पना याच अधिवेशनात निघाली. त्यावर्षी मुख्य महोत्सव सांगली येथे नोव्हेंबर महिन्यात झाला, तरी एप्रिल १९४४ मध्ये साहित्य संघाने मुंबई येथे नाट्योत्सव मोठ्या प्रमाणावर खुल्या नाट्यगृहात पुनः साजरा केला. इतकेच नव्हे, तर त्यानंतर दरसाल कमीअधिक प्रमाणात मुंबईत नाट्योत्सव साजरा करण्याची प्रथा पडली. ही प्रथा आजपर्यंत संघाने अव्याहत पाळली आहे. खुल्या नाट्यगृहाची प्रथा प्राचीन काळापासून चालत आली असली तरी अलीकडे मुंबईत व इतरत्र ती संघाने लोकप्रिय केली. १९४४ साली पहिला नाट्योत्सव साजरा करत असतानाच ‘साहित्य

संघाच्या व तत्सम इतर संस्थांच्या साहित्यविषयक चळवळींकरता व मुंबईतील नाट्यसंस्थांना प्रतिष्ठित समाजासमोर अल्प भाड्यात नाट्यप्रयोग करून दाखवण्याची सोय करणे' असा उद्देश डोळ्यांसमोर ठेवण्यात आला होता. तो तर साध्य केला गेलाच, शिवाय लवकरच गिरगावातल्या केळेवाडीतील जमीन संपादन करून संघाने तेथे एक अद्ययावत नाट्यगृह बांधले. ६ एप्रिल १९६४ रोजी या संघमंदिराचे उद्घाटन झाले आणि मराठी रंगभूमीला हक्काचे घर मिळाले. अण्णासाहेब किर्लोस्कर लिखित 'संगीत शाकुंतल'मधील नांदी १९३५ आणि १९६४ मध्ये साहित्य संघाच्या नाट्यगृहाच्या उद्घाटनाच्या वेळी सादर करण्यात आली होती.

प्रा. अ.बा. गजेंद्रगडकर, श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर, श्री. श्री.म. वर्दे, श्री. रामराव विजयकर, श्री. भास्करराव जाधव, श्री. भा. सी. सुकथनकर, श्री. र.धों. कर्वे, श्री. खं.सा. दौंडकर असे मुंबईच्या विविध समाजांतील थोर कार्यकर्ते संघाच्या बाल्यावस्थेत संघास लाभले आणि त्यांच्या विविध गुणांचा संघाला फायदा मिळाला म्हणूनच संघाबद्दल अल्पकाळात सार्वत्रिक आपुलकी निर्माण झाली, प्रतिष्ठा वाढली व साहित्य संघ मंदिराचे स्वप्न साकार झाले.

**संकलन – संजीव वेलणकर**

भ्रमणध्वनी : ९४२२३०१७३३

## प्रतिक्रिया

मा. संपादक लाळे सर,

साहित्य : मे–जून–जुलै २०२२चा त्रैमासिक सुबक, सुंदर अंक वाचायला मिळाला. यातील सर्व सदरे ही माहितीपूर्ण आहेतच. विशेषत्वाने मला उल्लेख करावासा वाटतो तो मा. प्रा. उषा तांबे यांनी दिलेला अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचा इत्थंभूत वृत्तांत. महामंडळाच्या स्थापनेपासून अगदी विभागवार मंडळांची, त्यांच्या कार्यपद्धतीची, साहित्य संमेलने आणि या सर्वांमध्ये कालानुरूप होत गेलेले बदल अगदी बारकाईने तपशीलवार संविस्तर सांगितले आहेत. विशेषत: नवोदितांसाठी ही महत्त्वाची आणि फार उपयुक्त अशी माहिती आहे. प्रत्येकाने संग्रही ठेवावा असा हा अंक आहे.

संपादक मंडळाचे पुनश्च आभार.

**विजो (विजय जोशी)**, डोंबिवली

साहित्य अंक मे–जून–जुलै २०२२ छान झालाय. महेश केळुसकर ह्यांचा रजनी परुळेकरविषयीचा 'आकाशभर एकाकीपणाची निवांत सावली' हा लेख अप्रतिम.

**– अनुपमा उजगरे**

अशोक बागवे यांचाही लेख वाचनीय. अंकच सुंदर, संग्राह्य आहे. नारायण लाळे, रेखाताई आणि संपादन टीमचे अभिनंदन. **– नरेंद्र पाठक**

## पुरस्कार

आपटे वाचन मंदिर, इचलकरंजीचा मराठी साहित्यातील सन २०२१ मधील 'पार्वती शंकरराव तेलसिंगे उत्कृष्ट बाल साहित्यकृती राज्यस्तरीय पुरस्कार' **एकनाथ आव्हाड** यांच्या 'छंद देई आनंद' बालकवितासंग्रहास प्राप्त.

महाराष्ट्र साहित्य परिषद दामाजीनगर शाखा, मंगळवेढ्याचा 'इंदुमती शिर्के उत्कृष्ट बालसाहित्य राज्यस्तरीय पुरस्कार' २०२१ 'छंद देई आनंद' बालकवितासंग्रहास जाहीर.

नांदेड येथील 'मातोश्री केवळबाई मिरेवाड उत्कृष्ट बालसाहित्य राज्यस्तरीय पुरस्कार' २०२१ 'छंद देई आनंद' बालकवितासंग्रहास जाहीर.

आनंदाची गोष्ट. बालभारती इयत्ता पहिलीच्या पाठ्यपुस्तकात एकनाथ आव्हाड यांच्या बालकवितेचा समावेश.

गंमतगाणी या त्यांच्या जोडाक्षर विरहित बालकवितासंग्रहातील 'शेतकरीदादा' या कवितेचा सन २०२२ पासून बालभारती इयत्ता पहिली उर्दू माध्यमाच्या पाठ्यपुस्तकात पाठ्यपुस्तक मंडळाने समावेश केला आहे.

---

आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी ह्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सव साजरा करणाऱ्या प्रतिष्ठित संस्थेतर्फे दरवर्षी काही लक्षणीय गद्य–पद्य साहित्यकृतींना पुरस्कार प्रदान करण्याचा समारंभ ज्येष्ठ कवयित्री इंदिरा संत ह्यांच्या स्मृतिदिनी होत असतो. या वर्षी 'कै. सुलभा मगदूम स्मृत्यर्थ लक्षणीय पद्य साहित्यकृती पुरस्कार' **डॉ. अनुपमा निरंजन उजगरे** ह्यांना 'काजव्यांचे झाड' ह्या अष्टगंध प्रकाशित पुस्तकास प्राप्त झाला. अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे विद्यमान अध्यक्ष मा. भारत सासणे ह्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

---

**प्रा. प्रतिभा सराफ** यांना 'उमलावे आतुनीच...' या कवितासंग्रहाला
१. आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी यांचा कै. वसंतराव दातार यांच्या स्मरणार्थ लक्षणीय काव्यसंग्रह पुरस्कार प्राप्त झाला.
२. **नेज** ता. हातकणंगले जि. कोल्हापूर येथील स्फूर्ती साहित्य संघ व पोतदार परिवार यांचेमार्फत्त कै. सत्यभामा भगवंत पोतदार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'श्रीशब्द' काव्य पुरस्कार जाहीर झाला.

'सहजसंवाद' या व्यक्तिचित्रणाच्या पुस्तकाला कोमसापचा अनंत काणेकर स्मृती पुरस्कार प्राप्त झाला.

# साभार पोच

● **माझ्या लॉकरमधील आठवणी**
हेमलता हरिहर सावे, काशिकेश प्रकाशन, दहिसर
मुखपृष्ठ - प्रफुल्ली शेवडे, पृष्ठ-१४८, मूल्य रु. २००/-

● **निसर्ग संवेदना**
समृद्धी केरकर, विवेकानंद साहित्य संस्कृती अभिवृद्धी मंच प्रकाशन, गोवा
मुखपृष्ठ - समृद्धी केरकर, पृष्ठ ८८, मूल्य रु. ५००/-

● **विस्मृतीच्या उंबरठ्यावर**
पौर्णिमा केरकर, विवेकानंद साहित्य संस्कृती अभिवृद्धी मंच, गोवा
पृष्ठ-२००, मूल्य रु. ६००/-

● **काश्मीर कनेक्शन**
प्रकाश पाटील, प्रकाशक : सौ. ज्योती कपिले, संपादन : मनोज आचार्य
मुखपृष्ठ - विष्णू थोरे, पृष्ठ-१९९, मूल्य रु. ३००/-

● **छंद देई आनंद ( बालकवितासंग्रह)**
एकनाथ आव्हाड, प्रकाशक - दिलीपराज प्रकाशन, पुणे
मुखपृष्ठ - सागर नेने, पृष्ठे - ६४, मूल्य रु. १५०/-

● **खळाळता अवखळ झरा आणि इतर कथा ( बालकथासंग्रह)**
एकनाथ आव्हाड, प्रकाशक - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
मुखपृष्ठ - चंद्रमोहन कुलकर्णी, पृष्ठे- ९६, मूल्य रु. १९५/-



# मुंबई मराठी साहित्य संघ


**विश्वस्त** : श्रीमती विजया दिवेकर, श्री अभिजित गजेंद्रगडकर, श्री. अभय भालेराव

**अध्यक्ष** : श्रीमती अचला जोशी

**उपाध्यक्ष** : श्री. माधव खाडिलकर, श्री. अशोक कोठावळे, श्री. गंगाराम गवाणकर, श्रीमती रजनी जोशी, डॉ. मधुकर केशव वर्तक, श्री. जयंत सावरकर

**नियामक मंडळ सदस्य** : प्रा. उषा तांबे, श्री. प्रकाश पागे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, श्री. सुभाष भागवत, प्रा. सुहासिनी कीर्तिकर, श्री. अशोक बेंडखळे, श्री. चंद्रशेखर गोखले, श्री. स्वामीकुमार बाणावलीकर, श्री. पद्माकर शिरवाडकर, प्रा. प्रतिभा बिश्वास, श्री. एकनाथ आव्हाड, प्रा. नरेंद पाठक, श्री. प्रमोद पवार, प्रा. प्रतिभा सराफ, श्रीमती सावित्री हेगडे, श्री. दिलीप भाटवडेकर, श्रीमती शकुंतला मुळ्ये, श्री. विलास म्हामणकर, श्री. सुधीर ठाकूर, डॉ. अश्विनी भालेराव गांधी, श्री. रोहिदास पांगे, श्रीमती रेखा नार्वेकर, श्रीमती शैलेजा म्हात्रे, श्री. मनोहर सोमण, श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर, श्री. यशवंत भिडे, डॉ. अनुपमा उजगरे, डॉ. दीपक पवार, डॉ. सुरेखा सबनीस, श्री. नारायण लाळे, श्री. अनंत दाभोळकर, श्री. सतीश सामंत, श्री. अनिल गचके, श्री. सारंग दर्शने, श्री. सिद्धार्थ पारधे, श्री. दिवाकर नातू, श्री. ज्ञानेश पेंढारकर

**स्वीकृत सदस्य** : श्रीमती मीनाक्षी जयकर, श्री. आमोद उसपकर

**सन्माननीय सल्लागार** : श्री. जयराज साळगावकर, श्री. दिनकर गांगल, श्री. प्रसाद कांबळी

**कार्यकारी मंडळ** : प्रा. उषा तांबे, श्री. प्रकाश पागे, डॉ. अश्विनी भालेराव गांधी, श्री. सुभाष भागवत, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, श्री. प्रमोद पवार, प्रा. सुहासिनी कीर्तिकर, श्री. मनोहर सोमण, श्री. अशोक बेंडखळे, श्री. रोहिदास पांगे, श्री. सुधीर ठाकूर, श्री. एकनाथ आव्हाड

# तिसऱ्या पिढीचे आत्मकथन

# २

संपादन

उज्ज्वला मेहेंदळे






मराठी भाषेविषयी आस्था असणा-या प्रत्येक मराठीप्रेमी वाचकाने वाचायलाच हवा असा ग्रंथ.
मुंबई मराठी साहित्य संघाचे अष्टदशकपर्वातील प्रकाशन.

## इये मराठीचिये नगरी.

संपादनः अशोक बेंडखळे,डॉ.उज्ज्वला मेहेंदळे
प्रस्तावनाःमधू मंगेश कर्णिक

संत ज्ञानेश्वर,संत नामदेव,संत एकनाथ,मुस्लिम संत,
स्वा.सावरकर,ब्रिटिश राजवट,कुसुमाग्रज,बहिणाबाई
आणि शिलालेख यांचे मराठी भाषेला योगदान.

सहभागी लेखकः व्याख्याते डॉ.सुधाकर देशपांडे,
डॉ.अरुण टिकेकर,डॉ. यु.म. पठाण, डॉ. कुमुद गोसावी,
प्रा. म.रा.जोशी,विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर,
ज्यो.जयंतराव साळगावकर,डॉ.निशिकांत मिरजकर,
डॉ.द.ता.भोसले

प्रकाशकः मुंबई मराठी साहित्य संघ, डॉ.भालेराव मार्ग,गिरगाव,मुंबई ४. फोनः२३८७६१५८
वितरक : ग्रंथाली, वुलन मिल म्यु.स्कूल,जे.के.सावंत मार्ग,माटुंगा(प.),मुंबई१६